
मोहनदास करमचंद गांधी



रा. रा. मोहनदास करमचंद गांधी.

मोहनदास करमचंद गांधी

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुखं स योगी परमो मतः ॥

— श्रीमद्भगवद्गीता

ह्मणोनि असो तें विशेषें । अथवा आपणपेंयासारिखें । जो चराचर देखे । अखंडित ॥ १ ॥
सुखदुःखादि वर्में । कां शुभाशुभें कर्में । दोनी ऐसीं मनोधर्में । नेणेचि जो ॥ २ ॥
हे समविषम भाव । आणिकही विचित्र जें सर्व । तें मानी जैसे अवयव । आपुले होती ॥३॥
हें एकैक काय सांगावें । जया त्रैलोक्यचि आघवें । मी ऐसें स्वभावें । बोधा आलें ॥ ४ ॥
तयाही देह एक कीर आथी । लौकिकीं सुखदुःखी तयातें ह्मणती । परि आह्मांतें ऐसी प्रतीती । परब्रह्मचि हा ॥ ५ ॥

— ज्ञानेश्वरी

धर्मानें जीवाचा उद्धार होतो आणि धर्माचरणानें नर नारायणपदास पोहोंचतो असें साधुसंतांनीं, महाजनांनीं, अनुभवसिद्ध महात्म्यांनीं सांगितलें आहे. पण हा नरास नारायणपदवी प्राप्त करून देणारा धर्म कोणता ? सामान्य पुरुष धर्माची जी व्याख्या करितात, त्याहून सत्पुरुष धर्माची व्याख्या निराळी करितात. देवाची पूजा करणें, त्याची प्रार्थना करणें, व्रतें उपोषणें करणें, उत्सव करणें, तीर्थयात्रा करणें, इत्यादिकांस सामान्य लोक धर्म समजतात. पण सत्पुरुषांचा धर्म याहून फार वेगळा असतो. तो संकुचित नसून विश्वव्यापि असतो. हें नाना कौतुकांनीं भरलेलें संपूर्ण विश्व ज्यानें निर्माण केलें, त्या परमात्म्याच्या चरणकमलीं शरण रिघून, हा सर्व माझ्या पित्याचा प्रपंच आहे असें मानून, सर्वांच्या जीवाची, सर्वांच्या योगक्षेमाची स्वतःच्या जीवासारखीच काळजी घेणें, इतर सुखांत असले तरच आपण सुखांत निमग्न होणें, इतरांस दुःख होत असल्यास आपले प्राण वेंचावे लागले तर तेही वेंचून त्यांच्या दुःखाचा परिहार करणें, आणि सर्व भूतमात्रांचे कल्याणाचे काजास आपली काया, आपली वाचा, आपलें मन-फार काय पण आपलें सर्वस्व-अर्पण करणें हा सत्पुरुष धर्म समजतात. हाच धर्म आचरण्याचा त्यांच्या मनानें संकल्प केलेला असतो, आणि '**देह जावो अथवा राहो**' असा निर्धार करून हाच धर्म ते आचरीत असतात. जड जीवास आत्मोद्धाराचा उपदेश करितांना ते ह्याच सकलविश्वव्यापी धर्माचें आचरण करावयास सांगतात आणि प्रत्यक्ष आपण हरदम घडघडी, प्रत्येक पळास, प्रत्येक पावलास जसें बोलतात तसेंच आचरण करून इतरांस उदाहरण घालून देतात. हें कर्म फार कठीण आहे.

"स्वयें बोलण्यासारिखें चालणें" हें अति दुर्घट तपाचरण आहे. रघुकुलावतंस श्रीरामरायाची कथा गातांना साधुवर्य श्री एकनाथ महाराजांनीं एका प्रसंगीं म्हटलें आहे कीं,

जैसें बोले तैसें करी।
त्यातें वंदिजे हरहरीं।
येर ते बोलाची फरारी।
तो संसारीं पढतमूर्ख ॥ १ ॥
जैसा बोल तसी क्रिया करित।
त्या नांव मुख्य परमार्थ।
येर बोलणें तें व्यर्थ।
विषयस्वार्थ वचनार्थी ॥ २ ॥

महान् अधिकारी पुरुष नाथांनीं वरील दोन ओव्यांत बोलणें व करणें यांमधील नातें कशा प्रकारचें असलें पाहिजे हें फार उत्कृष्ट रीतीनें सांगितलें आहे. जेथें ह्या दोहोंची जोडी जमली तेथें त्यास 'मुख्य परमार्थ' असें नांव नाथ देतात. आणखी असा पुरुष 'हरहरींही वंदिजे' असें सांगतात. केवढी थोरवी ही! धर्माचरण करणाऱ्याचा केवढा सत्कार हा! या सत्कारास पात्र अशीं जीं नररत्नें भरतभूमीच्या पोटीं येऊन स्वकुलाची व या श्रीराम–प्रल्हाद–सुधन्व्याच्या भूमीची कीर्ति वाढवितीं झालीं, त्यापैकीं पोरबंदरच्या गांधी कुलांत जन्मास आलेला मोहनदास हा एक होय. त्याचें चरित्र आजच्या प्रसंगीं परमादरानें आणि प्रेमभरानें आम्हीं वाचकांस सादर करितों.

जन्मभूमि

हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील चिमुकल्या काठेवाडद्वीपकल्पाच्या पश्चिमभागीं सुप्रसिद्ध द्वारकानगरी आणि श्रीक्षेत्रसोमनाथ यांच्या दरम्यान् पोरबंदर नांवाचें एक लहानसें पण इतिहासप्रसिद्ध राजधानीचें नगर आहे. अरबी समुद्र या नगराचें पादप्रक्षालन करितो व पूर्वी पोरबंदरला तो कधींकधीं आपल्या उत्संगावरही घेऊन खेळवीत असे. त्या वेळीं म्हणजे सुमारें ४०।४५ वर्षांपूर्वी या नगराची शोभा कांहीं निराळी दिसत असे. पण कालौघांत हिंदुस्थानांतील इतर जुन्या राजधान्यांप्रमाणें या राजधानीचीही कांति पालटून तिचें पूर्वीचें स्वरूप बदलून गेलें आहे. आज पोरबंदरच्या राणासाहेबांच्या ताब्यांत पन्नास गांव असून त्यांतील प्रजेचें ते ममतेनें पालन करीत आहेत, आणि प्रजाही सुखी आहे, ही गोष्ट जरी संतोष वाटण्यासारखीच आहे, तथापि जो जुना काळ गेला त्याची शोभा कांहीं वेगळीच होती. पोरबंदरचे ते त्या वेळचे जुन्या विचारांचे पण करारी व सत्वशील वृत्तीचे राणे, त्यांचे लहरी व मानी पण स्वप्रजेविषयीं वात्सल्यानें युक्त असे स्वभाव, त्यांचे पराक्रम, त्यांच्या गुजराथच्या इतिहासांतील कामगिऱ्या वगैरे गोष्टी मनःचक्षूंपुढें उभ्या राहूं लागल्या म्हणजे एक मोठा अत्यंत रमणीय चित्रपटच आपण पहात आहों असें वाटतें, आणि मनास एक प्रकारचा हर्ष होतो. आणखी तो जुना चित्रपट संपला म्हणजे " ते दिवस गेले, ते जुने राणे गेले आणि तें जुनें पोरबंदरही गेलें!" असे उद्गार मुखांतून बाहेर पडतात.

पोरबंदरला जसा प्राचीन राजकीय इतिहास आहे, तसाच त्याचा प्राचीन कालापासून चालत आलेला व्यापारी इतिहासही कौतुक करण्यासारखा आहे. सृष्टीनें प्राप्त करून दिलेलें रत्नाकराचें सान्निध्य ह्या नगरानें व्यर्थ न घालवितां येथील लोक प्राचीन काळापासून महासागरांतून दूरदूरच्या देशीं जाऊन व्यापार करीत आले आहेत. प्रचण्ड नौका बांधून त्या नौकांतून एडनपासून झांझिबारपर्यंत पोरबंदरकरांच्या नेहमीं फेऱ्या होत असावयाच्या. या दर्यावर्दीपणामुळें येथील लोकांच्या अंगीं साहजिकच एक प्रकारचा काटकपणा येऊन त्यांच्या रक्तांत स्वावलंबनाचें तेज मुरलें आहे.

मोहनदासांचा जन्म

हीच गांधींची जन्मभूमि. याच पोरबंदर नगरांत गांधींच्या एका पूर्वज पुरुषानें बांधलेलें व त्यानंतरच्या पुरुषांनीं शाखाविस्तार केलेलें

गांधींचें घर आहे. घरापुढें प्रशस्त अंगण असून त्याचे पुढें दोन्ही कोंपऱ्यांवर द्वारकाधीश श्रीकृष्ण व अयोध्याधीश श्रीराम यांचीं देवालयें आहेत. याच वडिलोपार्जित घरांत इसवी सन १८६९ सालच्या आक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या तारखेस घरचे यजमान करमचंद गांधी यांच्या द्वितीय भार्येस पुत्ररत्न झाल्याची सुवार्ता सुवासिनींनीं बाहेर येऊन सांगितली. ती ऐकून सर्वत्रांस अत्यानंद झाला व गांवांत साखरा वांटल्या. पुढें सहावे दिवशीं मोठ्या थाटानें षष्ठीपूजन करण्यांत आलें व बालकाचें नांव कुलपुरोहिताच्या सांगण्याप्रमाणें ‘ मोहनदास ’ असें ठेविलें. हेच आमचे चरित्र-नायक होत.

वाडवडील

मोहनदासांची चरित्रकथा पुढें सांगण्यापूर्वीं त्यांच्या वडिलांची थोडीशी माहिती या ठिकाणीं सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं. या माहितीवरून मोहनदास ज्या कुलांत जन्मास आले त्यांतील पूर्वज कसे होते हें आपल्यास कळून येईल.

पोरबंदरचें राजघराणें आणि गांधींचें घराणें यांचा संबंध फार जुन्या काळापासून चालत आलेला आहे. पोरबंदरची दिवाणगिरी याच घराण्यांतील पुरुषांकडे होती. मोहनदासांचे आजे ह्मणजे करमचंदांचे वडील उत्तमचंद गांधी हे पुष्कळ वर्षे पोरबंदरचे दिवाण होते. हा पुरुष विलक्षण करारी स्वभावाचा असून त्याची राजभक्ति जाज्वल्य होती. एकदा बालराजा विकमतजी हे गादीवर असतां कांहीं कारणामुळें उत्तमचंदांवर आईसाहेबांची मर्जी खप्पा झाली. त्यामुळें त्यांस दिवाणगिरी सोडून रातोरात पळून जावें लागलें. त्यांचे पश्चात् त्यांच्या घरावर तोफा डागण्यांत आल्या. हे तोफांच्या गोळ्यांचे मारे अद्यापिही दृष्टीस पडतात. उत्तमचंद पोरबंदराहून जुनागडास गेले. तेथील नबाबानें त्यांचा सत्कार करून त्यांस आश्रय दिला. या प्रसंगीं झालेली एक गोष्ट नबाबाच्या लक्षांत आली नाहीं असें पाहून जवळच्या लोकांनीं नबाबसाहेबांस हळूच सुचविलें कीं, “ सरकार, पोरबंदरच्या दिवाणानें आपल्यास उजव्या हातानें मुजरा न करितां डाव्या हातानें केला. ” अशा प्रकारचा अपमान करणारास तत्काळ शिरच्छेदाचीच शिक्षा व्हावयाची , पण उत्तमचंदांची पुण्याई जबर ह्मणून नबाबानें त्यांस त्यांच्या कृतीचा अर्थ विचारला. तेव्हां पोरबंदरच्या दिवाणांनीं मोठ्या विनयानें पण बाणेदारपणा न सोडतां जबाब दिला कीं, “ नबाबसाहेब, माझे वाटेल तसे जरी हाल झाले तरी हा उत्तमचंदाचा उजवा हात पोरबंदरच्याच गादीला मुजरा करील. तो हात मी त्याच गादीला वाहिलेला आहे. ” पदच्युत दिवाणाचा हा स्वराज्याभिमान पाहून नबाबास क्रोध आला नाहीं. उलट त्याबद्दल उत्तमचंदांचा त्यानें मोठा गौरव केला, आणि पोरबंदरांतील वातावरण निवळेपर्यंत त्यांस सन्मानानें आपल्या पदरीं पाहुणा ह्मणून ठेवून घेतलें. पुढें त्यांस पोरबंदरांत पुन्हा बोलावून नेलें.

उत्तमचंद वारल्यावर दिवाणगिरीचीं वस्त्रें करमचंदांस मिळालीं. करमचंदांनीं हें काम पंचवीस वर्षे केल्यावर, त्यांजवरही राणासाहेबांची अवकृपा झाली. त्या काळच्या राजांची दिवाणगिरी करणें ह्मणजे एक प्रकारचें दिव्यच असे. करमचंद पोरबंदरहून राजकोटास गेले आणि तेथील ठाकुरसाहेबांची दिवाणगिरी त्यांनीं पतकरिली. हें काम करीत असतां एकदा राजकोटचे असिस्टंट पोलीटिकल एजंट एक साहेब होते, त्यांची व करमचंदांची कांहीं कामावरून बोलाचाली झाली. त्या समयीं साहेब ठाकूरसाहेबांसंबंधानें कांहीं उद्धटपणाचे शब्द बोलले. मनांत आल्यास एजंटसाहेब आपली दिवाणगिरीही काढून घेण्यास समर्थ आहेत, ही गोष्ट पूर्णपणें जाणत असतांही करमचंदांनीं साहेबांस जबाब विचारिला. हें पाहून साहेब विशेषच रागावले आणि त्यांनीं दिवाणांस आपली माफी मागण्यास सांगि-

तलें. करमचंदांनीं ही गोष्ट कबूल केली नाहीं. तेव्हां साहेबांनीं त्यांस ताबडतोब कैद करण्याचा हूकूम देऊन कांहीं तासपर्यंत एका झाडाखालीं अटकेंत ठेविलें. तरीही करमचंदांनीं आपलें ह्मणणें मागें घेतलें नाहीं. आपला खंबीरपणा त्यांनीं ढळूं दिला नाहीं. शेवटीं त्यांच्या सत्याग्रहाचा विजय झाला, माफीचा आग्रह साहेबांनीं सोडून दिला आणि उभयतां मित्र झाले.

करमचंदांचे शेवटचे दिवस फार दुःखांत गेले. आपल्या मुलाच्या लग्नासाठीं ते राजकोटाहून पोरबंदरास जात असतां गाडी उलटून पडले. त्यांस फार इजा झाली. त्या दुखण्यांतून ते कांहीं बरे झाले नाहींत. ह्या अखेरच्या दिवसांत मोहनदासांनीं अष्टौप्रहर त्यांचे चरणांपाशीं राहून त्यांची मोठ्या भक्तिभावानें शुश्रूषा केली, आणि पित्याचा आशीर्वाद–धन नव्हे पण नश्वर धनाहून लाखों पटीनें श्रेष्ठ असें आशीर्वादधन–संपादन केला.

गांधी हे जातीनें वैश्य. त्यांचा धर्मपंथ वैष्णव. करमचंद गांधी हे मोठे कडकडीत वैष्णव होते. त्यांचें आचरण अंतर्बाह्य निर्मळ आणि सुवर्णाप्रमाणें झळझळीत होतें. सर्व भगवद्गीता त्यांस मुखोद्गत होती. जुन्या राजदरबारांत त्यांनीं दिवाणगिरी केली, पण कधीं कोणाच्या कवडीस स्पर्श केला नाहीं, अथवा सत्यापासून आपलें मन तिळमात्र ढळूं दिलें नाहीं. धनाचा त्यांनीं कधींही लोभ धरिला नाहीं. एवढेंच नव्हे तर आपल्या त्रेसष्ठ वर्षांच्या हयातींत जी कांहीं थोडीबहुत कमाई त्यांनीं केली, ती बहुतेक सर्व दानधर्मांत खर्च केली. मोहनदास आपल्या वडिलांच्या गोष्टी सांगूं लागले ह्मणजे विलक्षण भक्तीनें व प्रेमानें त्यांचें हृदय भरून येतें आणि त्यांच्या नेत्रांतून खळखळां प्रेमाश्रू वाहूं लागतात. लहानपणीं मोहनदासांकडून त्यांच्या सर्व पूर्वजांचा वंश–वृक्ष पाठ करून घेतला होता व तो नित्य त्यांजकडून ह्मणून घेत असत.

मोहनदासांची माता

मोहनदासांची आई हें करमचंदांचें दुसरें कुटुंब. मोहनदास हा तिचा एकुलता एक मुलगा. ही बाईही आपल्या पतीस अनुरूप अशाच उत्तम स्वभावाची व बाणेदार वृत्तीची बायको होती. दागिन्यांचा तिला लोभ नव्हता. आर्यसुवासिनींचे जे सौभाग्यालंकार त्यांवांचून इतर अलंकार अंगावर घालून तिनें आपली काया कधींही मिरविली नाहीं. नाकांत नथ, गळ्यांत सौभाग्यमणि आणि हातांत हस्तिदंताचीं कंकणें एवढींच भूषणें तिच्या अंगावर असत. तिचें धर्माचरण फार कडकडीत होतें. ती सात सात दिवस निराहार उपोषणें करी आणि देवाच्या भजनपूजनांत तन्मय होऊन जाई. घरांतील कोणाही मनुष्यानें-मग तें लहान मूल असो अगर मोठें मनुष्य असो वांकडें आचरण केलेलें तिला खपत नसे. तथापि तिचें अंतःकरण इतकें मृदु व प्रेमळ होतें कीं, घरांतील सर्व मुलें सारा दिवस तिच्या भोंवतीं असत. घरांतील कोणीही मनुष्य आजारी असो, तिनें रात्रींच्या रात्री जागून त्याची शुश्रूषा करावी. कोणी शेजारीपाजारी अडचणींत आहे असें तिला कळलें, मग तो ब्राह्मण असो, शूद्र असो, वा कोणी असो, कीं तिनें त्याच्या साहाय्यास धांवावें आणि त्याची अडचण दूर करावी. रोज सकाळीं तिच्या दारावर पंचवीसतीस माणसांचा थवा जमत असे, आणि त्या सर्वांस ती अन्नदान करी. मोहनदासांचे चरित्रकार रेव्हरंड डोकसाहेब ह्मणतात, " या बाईचें घर ह्मणजे एक धर्ममठ होता आणि ही बाई ह्मणजे हिंदुस्थानची साध्वी इलिझाबेथ होती." मोहनदासांच्या स्वभावघटनेस ह्या बाईचें आचरण पुष्कळांशीं कारण झालें. तिची मूर्ति मोहनदासांच्या दृष्टीपुढें नेहमीं असते. संकटांत ती त्यांना आश्वासित असते, त्यांना धीर देत असते, आणि अधःपातापासून त्यांचें संरक्षण करीत असते. दोन तीन वेळा ते मार्गभ्रष्ट होऊन भयंकर अधःपात होण्याच्या मर्यादेपर्यंत जाऊन

पोहोंचले होते, पण तिनें त्यांच्या मनोमंदिरीं प्रगट होऊन त्यांना मागें खेंचलें आणि त्यांस सन्मार्गावर आणून सोडिलें.

विद्याभ्यास

अशा मातापितरांच्या पोटीं मोहनदासांचा जन्म झाला. ते थोडे मोठे झाल्यावर त्यांना पोरबंदरांतील एका खासगी पंतोजीच्या शाळेंत घातलें व तेथें त्यांच्या स्वभाषेच्या शिक्षणास प्रारंभ झाला. पुढें ते सात वर्षांचे असतां त्यांचे वडील करमचंद यांस राजकोटास जावें लागल्यामुळें सर्व कुटुंब त्यांनीं आपल्याबरोबर नेलें आणि मोहनदासांस तेथील एका सरकारी शाळेंत घातलें. त्या वेळेपासून सर्व मंडळी राजकोटासच राहूं लागली. कांहीं कार्यप्रस्थ असलें, सणसमारंभ असला, तरमात्र ती पोरबंदराच्या घरीं जात येत असे. राजकोटापासून पोरबंदर १२० मैल असून बैलगाडीनें तेथें जाण्यास पांच दिवस लागत. राजकोटांतील गांधींचें घर राजवाड्यापासून जवळच होतें. मोहनदास दहा वर्षांचे झाल्यावर त्यांस काठेवाड हायस्कुलांत घातलें. या शाळेचे मुख्याध्यापक एक पारशी पदवीधर गृहस्थ होते. या शाळेंतून आपल्या वयाचे सतरावे वर्षी मोहनदास मॅट्रिक्युलेशनची परीक्षा उत्तीर्ण झाले.

या शाळेंतील दिवसांत मोहनदासांच्या चरित्रांतील दोन महत्वाच्या गोष्टी घडल्या. एक, त्यांचा विवाह व दुसरी त्यांच्या धर्मविचारांतील क्रांति.

विवाह

मोहनदास बारा वर्षांचे असतांना त्यांचें लग्न झालें. या लग्नाचा वाङ्निश्चय यापूर्वीच चार वर्षें झाला होता. त्या वेळीं सर्व मंडळी पोरबंदरास होती. लग्नसमारंभही पोरबंदरचेच घरीं झाला. ह्या लग्नासंबंधानें एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आमच्या इकडील पद्धतीप्रमाणें—आणि मोहनदासांचें लग्न ज्या वेळीं झालें तो काळतर जुनाच होता—लग्नापूर्वी वधूवरांची नुसती दृष्टादृष्टही झालेली नसते. पण मोहनदासांच्या बाबतींत मात्र असा प्रकार झाला नाहीं. लग्नापूर्वी कांहीं महिने आधीं करमचंदांनीं आपल्या भावी स्नुषेस आपल्या राजकोट येथील घरीं आणली होती व दोन्हीं मुलें लग्न होईपर्यंत एकत्र खेळत होतीं. मोहनदासांचें लग्न अगदींच अल्पवयांत झालें ही गोष्ट जरी खरी, तथापि स्वतः मोहनदासांचें मत बालविवाहाच्या विरुद्ध आहे. या बाबतींत त्यांचें असें ह्मणणें आहे कीं, या चालीनें राष्ट्राची जीवनशक्ति शोषून घेतली आहे व ही चाल दुसऱ्या अनेक अनर्थांचें मूळ आहे. पण उलट बाजूनें त्याचें असेंही मत आहे कीं, अशा तऱ्हेनें संवई व स्वभाव यांचा परिपोष होण्यास प्रारंभ होण्यापूर्वी जडलेला जन्मसंबंध सुदैवानें जर उभयतांस सुखावह झाला तर उभयतांचे आत्मे ज्या पूर्णैक्याच्या स्थितीस पोहोंचतील ती स्थिति अन्य कोणत्याही मार्गानें प्राप्त होणें शक्य नाहीं. हें त्यांचें मत बहुधा त्यांच्या स्वतःच्याच अनुभवावरून ठाम झालें असावें. कारण मोहनदास आणि त्यांची सुशील आणि सत्वधीर भार्या यांचें प्रेम श्रीराम आणि सीतादेवी यांच्यासारखें आहे. आपल्या पतीबरोबर वनवास–तुरुंगवास भागावयास ती मागें सरलेली नाहीं इतकेंच नव्हे तर आपला हृदयनाथ कारागृहांत असतां अन्नपाणी वर्ज करून ती आपल्या पतीस बल व धैर्य देण्याविषयीं परमेश्वरापाशीं अहर्निश प्रार्थना करीत असते. तिला तीन पुत्र आहेत व तिघेही आईबापांच्या शिक्षणानें व उदाहरणानें त्यांच्याचसारखे निपजले आहेत. असो.

भयंकर मोहांतून बचाव

मोहनदास शाळेंत शिकत असतांना त्यांच्या धर्मविचारांत क्रांति करणारी एक गोष्ट घडली ह्मणून वर सांगितलेंच आहे. या वेळीं ते इंग्रजी चौथ्या इयत्तेंत होते. हा कालपर्यंत ते घरच्या देवांची मोठ्या भक्तिभावानें व श्रद्धेनें पूजा करीत असत. पण शाळेंतील सोबत्यांच्या सहवासामुळें त्यांची ही पूर्वीची वृत्ति एकदम बदलून ते नास्तिक बनले

प्रत्येक गोष्टीचा फार बारकाईनें विचार करावयाचा ही त्यांची उपजतच स्वभावप्रवृत्ति असल्यामुळें ते धर्माच्या प्रत्येक कृत्याचीं कारणें विचारूं लागले. आईचें धर्मशिक्षण त्यांच्या बदललेल्या विचारांस पटेना. शेवटीं दुसरा मार्गच नसल्यामुळें त्यांच्या मनानें नास्तिक मतांचा स्वीकार केला. आपले परंपरागत कुलधर्मही ह्या वेळेपासून त्यांस आवडेनातसे झाले. रेव्हरंड डोकसाहेब ह्मणतात, "त्यांचा स्वभावगुण बनलेल्या फक्त एका सवयीनें नवीन विचारभराखालीं मोडून न जातां या प्रसंगीं त्यांचें संरक्षण केलें."

या आणीबाणीच्या प्रसंगीं ज्या संवयीनें त्यांचें नैतिक व धार्मिक विनाशापासून रक्षण केलें ती संवय ह्मणजे सत्यपरायणता ही होय. मोहनदासांचें आचरण व सत्य हीं आज दिवसपर्यंत कधींही एकमेकांस सोडून वेगळीं राहिलेलीं नाहींत. त्यांचें आचरण ह्मणजे सत्याचा आदर्श आहे.

राजकोटच्या हायस्कुलांत कांहीं नास्तिक विद्यार्थी होते व त्यांनीं आपली एक लहानशी मंडळी बनविली होती. त्या मंडळीबरोबर मोहनदासांची मैत्री जमली. या मंडळीनें हळूहळू एकाएका हिंदु आचारास रजा देऊन हळूहळू ते धीट बनत चालले होते. हिंदु देवांची ते थट्टा उडवीत असत. शेवटीं त्यांचें धाष्टर्य इतक्या थरास जाऊन पोंहोंचलें कीं, ते मांस खाऊं लागले. त्यांच्यांत जो पुढारी होता, त्यानें मंडळीपुढें असें प्रतिपादन केलें कीं, इंग्लिश लोक इतके बळकट व पिळदार बांध्याचे आहेत याचें कारण ते मांस खातात हेंच होय. एका मुसलमान मित्रानें ह्या ह्मणण्यास दुजोरा दिला. शेवटीं आपला शिक्षकही हाच आहार करतो असें त्यांस कळलें. झालें. या मान्यापुढें त्यांच्या मनांतील अनेक वर्षांच्या संस्कारांचा किल्ला ढांसळला. वाडवडिलांनीं निषिद्ध मानलेलें कृत्य त्यांनीं केलें. या प्रसंगीं आपल्या मनाची स्थिति कशी झाली याविषयीं मोहनदास ह्मणतात, "तें भक्षण करितांना पहिल्यानें ओकारी आली. पण सर्वांत भयंकर गोष्ट ही कीं, त्या कृत्याची आठवण रात्रीच्या काळ्याकुट्ट अंधकारांत पिशाचासारखी आह्मांस भेवडावीत होती. त्या रात्रीं पापकृत्य करणारांस निमिषार्धही झोंप आली नाहीं." पहिल्या रात्रीं असा अनुभव आला, तथापि दुसरे लोक आपल्यास वेडगळ, जुन्या चालीचे ह्मणतील, या लज्जेनें त्या मंडळीनें आपला क्रम नेटानें सुरू ठेविला, आणि इंग्लिश लोकांप्रमाणें बळकट होण्याचा त्यांनीं निश्चय केला. या मंडळींत बबर्जींच्या कसबांत तरबेज झालेला एकजण होता. तो रोज नवे नवे प्रकार बनवूं लागला, आणि मंडळीलाही ते आवडूं लागले. मात्र हा व्यवहार गुप्तपणें एकांतस्थळीं होत असे.

सत्यप्रीतीचा जय

बाकीचे सर्व सोबती खालीं खालीं वहात चालले असतां, एका सत्यप्रीतीनें मोहनदासांना हात देऊन मागें खेचलें, आणि त्यांच्या विनिपाताचा भयंकर अनर्थ टळला. कपटाचरणाचा त्यांना अत्यंत तिटकारा असे. आणि मंडळीनें जी गोष्ट चालविली होती ती तर फार गुप्तपणें. मातृभक्त मोहनदासांच्या मनास वारंवार वाटे कीं, जें कृत्य आपण लपूनछपून करीत आहों तें जर आपल्या आईला कळलें तर तिचा हृदयभंग होईल. तें ऐकून आपल्या आईची काय अवस्था होईल कोण जाणे! लपवालपवीचे प्रयत्न त्यांनीं चालविले होते, पण तसें करणें त्यांच्या जिवावर येत होतें. मोहनदासांचा दुसरा भाऊही या मंडळींत होता. ते दोघेही रोज कांहींतरी निमित्य सांगून आईची परवानगी मिळवून सायंकाळीं बाहेर जात. रात्रौ घरीं परत आल्यावर जेवणाचे वेळीं त्यांना अर्थातच भूक नसे, तेव्हां पुन्हा कांहींतरी सबब आईला सांगावी लागे. अशा प्रकारें रोज नव्या नव्या लबाड्या रचून सांगणें त्यांना कठीण जाऊं लागलें. शेवटीं दोन्ही भावांनीं मनाचा निश्चय करून आपल्या सोबत्यांची संगति

सोडून दिली, आणि ते पुन्हा आपल्या जुन्या मार्गास लागले. प्रतारणा करून स्वैराचरण करण्याचा मोह त्यांच्या मनास पडला नाहीं. पुढें कांहीं वर्षांनंतर मोहनदास विलायतेस गेले त्या वेळींही मातृभक्तीनेंच त्यांचा सुनिश्चय सांभाळला. मोहनदासांचें हें शाळेंतील वाममार्गाचरण शेवटपर्यंत त्यांच्या आईबापांस कळलें नाहीं. मोहनदासांची मातृभक्ति अलौकिक आहे. थोरांच्या स्वभावाविषयीं ह्मटलेंच आहे कीं, त्यांना "**जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी**" वाटते.

संदेशकथन

मोहनदास मॅट्रिक झाल्यावर भावनगर येथील कॉलेजांत जाऊं लागले. पुढें सुट्टींत ते राजकोटास घरीं आले असतां त्यांचे घरचे मंडळीस भेटावयास आलेल्या एका ब्राह्मणमित्रानें त्यांचे अभ्यासाची चौकशी केली, आणि तो मोहनदासांस ह्मणाला "बाबारे, आपल्या देशांत वर डोकें काढावें अशी जर तुझी इच्छा असेल, वडिलांसारखें आपणही मोठें व्हावें असें जर तुझ्या मनांत असेल, तर इथें राहून पदवीधर होण्याचा विचार तुला सोडून दिला पाहिजे. माझें आपलें तुला असें सांगणें आहे कीं, तूं विलायतेस जा आणि बॅरिस्टर हो."

विलायतेस जाण्याची तयारी

तरुण मोहनदासांच्या मनावर ब्राह्मणाच्या ह्या संदेशकथनाचा तत्काल परिणाम झाला. प्रवास करण्यास त्यांचें मन उत्कंठित झालें. मोठेपणाचीं त्यांना स्वप्नें पडूं लागलीं. देशांतरीं जाण्यास ते तयार झाले. पण ही गोष्ट करण्यास त्यांना आईची व भावाची संमति पाहिजे होती. त्यांचे वडील या वेळीं हयात नव्हते, ते चार वर्षांपूर्वी वारले होते. भावाची संमति मिळविण्यास त्यांना फारसे प्रयास पडले नाहींत. एवढेंच नव्हे तर विलायतेस जाऊन शिकण्यास लागणाऱ्या खर्चाचे तजविजीसाठीं वडिलांनीं ठेवलेली थोडीशी मिळकत व घरांतले दागिने विकण्यासही तो तयार झाला.

शपथ

एथपर्यंत सर्व तयारी ठीक जुळली. पण आईची संमति मिळाल्याशिवाय मोहनदास विलायतेस जाण्यास तयार नव्हते आणि तिची गोष्ट तर अगदीं वेगळी होती. तिला असें भय पडलें कीं, आपला मुलगा तेथें रीतीनें राहून शिकला तर बरें, नाहींपेक्षां तेथील मोहांत पडल्यास तो धर्मभ्रष्ट व नीतिभ्रष्ट झाल्याशिवाय कदापि राहाणार नाहीं. ह्या अधःपाताचें भयंकर चित्र तिच्या डोळयांपुढें उभें राहून त्या धर्मपरायण माउलीचें हृदय कांपूं लागलें. लंडनशहरांतील अनाचारांच्या गोष्टी तिनें ऐकिल्या होत्या. त्यामुळें आपल्या मुलास जा ह्मणण्यास तिच्यानें धीर होईना. शेवटीं नाना प्रकारांनीं तिची समजूत घालून तिच्या मनांत विश्वास उत्पन्न केल्यावर "**शुभास्ते पन्थानः सन्तु**" असा आशीर्वाद देण्यास ती तयार झाली. पण हा आशीर्वाद देण्यापूर्वी आपल्या मुलाकडून तिनें शपथ वाहून घेतली. मोहनदास ह्मणतात, "अभ्यास करावयास मी विलायतेस जाऊं का? ह्मणून मी जेव्हां आईला विचारलें, तेव्हां प्रथम अनेक वेळा तिनें नकारच दिला. पण अखेरीस ती एका अटीवर कबूल झाली. त्या दूरच्या शहरांत स्वैरवृत्तीनें व अनीतीनें वागणाऱ्या माणसांच्या गोष्टी तिनें ऐकिल्या होत्या, त्यामुळें आपल्या मुलाविषयीं तिला भय वाटूं लागलें. तिनें मला एका जैन पंथाच्या स्वामीकडे नेलें व **मद्य, मांस, व स्त्री, या त्रयीच्या मोहापासून मी दूर राहिन** अशी शपथ त्या स्वामीपुढें तिनें मला घ्यावयास लाविली. आणि त्या शपथेनें लंडनमध्यें अनेक अधःपातांपासून माझें रक्षण केलें."

बहिष्कार

आईची परवानगी मिळाल्यावर मोहनदास विलायतेस जाण्याचे तयारीस लागले. ते पोरबंदरास आपल्या वडिलोपार्जित घराचें दर्शन घ्यावयास

व आपल्या नातलगांस भेटण्यास गेले. त्या वेळीं सर फ्रेडरिक लेली हे पोरबंदरास ब्रिटिश ॲडमिनिस्ट्रटर होते. त्यांचेकडे सरकारांतून स्कॉलर्शिप मिळविण्याची खटपट मोहनदासांनीं केली, पण ती सफळ झाली नाहीं. पण दुसरीकडून त्यांस यश मिळालें. करमचंदांच्या मागून त्यांचे बंधू पोरबंदरचे दिवाण झाले होते, त्यांनीं आपल्या पुतण्यास आशीर्वाद देऊन विलायतेस जाण्यास उत्तेजन दिलें. त्यांचें प्रयाण त्यांच्या जातभाईंस मात्र मान्य झालें नाहीं. त्यांनीं मुंबईस महाजनांची सभा भरवून सत्याग्रही मोहनदासास आपल्यांतून बहिष्कृत केलें!

लंडनशहरांत

सन १८८८ च्या सपटंबर महिन्यांतील एके दिवशीं दुपारीं मोहनदास दोघां हिंदी उतारूंसह लंडनच्या धक्यावर उतरले. तेथें त्या अफाट शहरांत आपल्या मित्रांस कोठें शोधावें अशा विचारांत पडून अखेरीस ते व्हिक्टोरिया हॉटेलांत उतरण्यास गेले. हा दिवस मोहनदासांच्या स्मरणांत पक्का राहिला आहे. पहिल्या प्रथम तर त्यांना अगदीं एकलकोंडें वाटूं लागलें. पण एक हिंदी मित्र तार पोचतांच त्यांना भेटावयास आला व त्यामुळें त्यांना थोडें बरें वाटलें. तो गृहस्थ लंडन शहरांत बरेच दिवस राहिला होता. मोहनदासांचा साधा पोशाख वगैरे पाहून त्यांची त्यानें थट्टा केली, व त्यांना "इंग्लिश जंटलमन" बनविण्यासाठीं तो बाहेर घेऊन गेला. त्यानें रिचमंड येथें मोहनदासांची राहण्याची व्यवस्था करून दिली व त्यांस तो नवीन दीक्षा देऊं लागला. तो स्वतः मांसाशन, मद्यपान, धूम्रपान व मंडळीबरोबर चैन करणें या गोष्टींत वाकबगार झालेला होता. या गोष्टी आपल्या चेल्यास शिकविण्याचा तो प्रयत्न करूं लागला. गुरूची विद्या शिष्यानें उचलली असती, पण त्याच्या हृदयांतील जाज्वल्य मातृभक्ति आड आली. मातेचें स्मरण होऊन मोहनदास मागें सरले.

खोटा मोठेपणा

पण मोहनदास व्यसनावर्तांत जरी सांपडले नाहींत, तरी खोट्या मोठेपणाच्या भरीस पडून पहिल्या तीन महिन्यांत त्यांचा बराच काल व बराच पैसा खर्च झाला. मोहनदास ह्मणतात, "पहिल्यानें मला असें वाटलें कीं, नृत्यकला, वक्तृत्व, फ्रेंच भाषा व 'व्हायोलिन'चें वादन यांचा अभ्यास करणें अवश्य आहे. अशा गोष्टींचा अभ्यास करणें हाच काय तो इंग्लिश गृहस्थ होण्याचा मार्ग होय अशी माझी समजूत झाली." पण पुढें ह्या गोष्टी आपल्या अभ्यासास निरुपयोगी आहेत असें त्यांस आढळून आल्यावर त्यांनीं त्या सोडून दिल्या. त्यांच्या मित्रानें त्यांस आपल्या मार्गाकडे वळविण्याची पराकाष्ठा केली, पण आईला दिलेली शपथ प्रत्येक वेळीं त्यांच्यापुढें उभी राहून तिनें त्यांस मागें ओढलें. मित्राला हें कारण जेव्हां कळलें, तेव्हां तो संतापून ह्मणाला, "शपथ, हा गद्धया! शपथ पाळायाची होती तर तूं इथें आलास कशाला? तूं जर माझा भाऊ असतास तर मी तुझें टाळकेंच सडकलें असतें!"

एकदां 'हालबोर्न रेस्टारंट'मध्यें विद्यार्थ्यांस मेजवानी होती. मोहनदासांनाही आमंत्रण असल्यामुळें त्यांचा मित्र त्यांना तेथें घेऊन गेला. मित्राची समजूत अशी कीं, मंडळींत तरी भिडेनें मोहनदास नको होय वगैरे कांहीं ह्मणणार नाहींत; पण ह्या पुरुषाचें स्वभावबल त्यानें ओळखलें नव्हतें हेंच खरें. मोहनदास सांगतात, "जेव्हां पहिला पदार्थ आला तेव्हां वाढप्यास जवळ बोलावून यांत काय घातलें आहे ह्मणून मी विचारलें. ही गोष्ट मित्रानें पाहिली व तो मला ह्मणाला, 'सभ्य मंडळींत बसावयास तूं योग्य नाहींस. तुला सभ्य गृहस्थासारखें वागतां येत नसेल, तर तूं आपला चालता हो.' मी निघून आलों."

खरी विद्यार्थीवृत्ति

मोहनदास या वेळीं 'इनरटेंपल' मध्यें बॅरिस्टरचा अभ्यास करित होते. वर सांगितलेल्या तऱ्हेनें कांहीं महिने घालविल्यावर, आजपर्यंत आपण खोट्या मोठेपणाचे भरीस पडून पैसा व काल यांचा व्यर्थ अपव्यय केला ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली, व आतांपर्यंत आचरिलेला मार्ग साफ सोडून देण्याचा त्यांनीं निश्चय केला. त्यांनीं आपली व्हायोलिन विकून टाकली, नृत्यकला व वक्तृत्व यांचा अभ्यास सोडून दिला व पूर्वीपेक्षां ते अगदीं साध्या तऱ्हेनें राहूं लागले. 'इनर टेंपल' मध्यें त्यांचा अभ्यास चालू होताच, त्याशिवाय लंडन युनिव्हर्सिटीचा मॅट्रिक्युलेशन परीक्षेचा अभ्यास ते करूं लागले. त्यांनीं एक लहानशी आपल्या एकट्यापुरती खोली घेतली, एक 'स्टोव्ह' विकत घेतला आणि महिन्याचा एकंदर, खर्च ते फक्त चार पौंडांत भागवूं लागले. सकाळीं दुपारीं ते आपल्या स्टोव्हवर पेज करून ती जेवीत व रात्रौ, ज्यांत शाकाहाराचेंच भोजन असे अशा एका भोजनगृहांत आपलें भोजन उरकीत. या भोजनासही एका शिलिंगापेक्षां जास्त पैसे त्यांनीं कधींही खर्चिले नाहींत. पुष्कळ वेळां सहा पेन्सांतच (पांच सहा आण्यांत) ते आपली भूक भागवीत. विद्यार्थीवृत्तीचा ध्यास धरल्यापासून "इंग्लिश जंटलमन" होण्याच्या कल्पनेचा त्यांस विसरच पडला. अशाप्रकारें त्यांनीं तीन वर्षे घालविलीं. या अवधींत त्यांनीं निरनिराळ्या धर्मांचा व धर्मपंथांचा फार शोधक बुद्धीनें अभ्यास केला, व प्रत्येक धर्मांत त्यांस जें जें कांहीं चांगलें दिसलें तें तें त्यांनीं आपल्या हृदयकोशांत सांठविलें. तथापि त्यांच्या मनाची तळमळ शांत झाली नाहीं. शेवटीं त्यांनीं **गीतामृत** प्राशन केलें, त्या वेळीं त्यांच्या आत्म्याची तृप्ति होऊन त्यांचें हृदयमंदिर दिव्य प्रकाशानें भरून गेलें. पण याविषयीं पुढें सांगू. असो. मोहनदास बॅरिस्टरच्या परीक्षेंत सन्मानानें उत्तीर्ण झाले व बॅरिस्टरांच्या यादींत त्यांचें नांव यथाविधि दाखल करण्यांत आलें. नंतर लवकरच स्वगृहीं येण्यासाठीं ते विलायतेहून निघाले.

मातृवियोग

पण घरीं येऊन त्यांनीं सुवार्ता श्रवण करावी अशी मानवांच्या भागधेयाशीं क्रीडा करणाऱ्या कालाची इच्छा नव्हती. ते मुंबईस आल्यावर आपली परमप्रिय मातुःश्री आपल्यास टाकून स्वर्गीं गेल्याचें शोककारक वृत्त त्यांस कळलें. त्यांची आई बरेच दिवसांपूर्वीं इहलोकाचा त्याग करून गेली होती, पण ही बातमी मोहनदासांच्या मित्रांनीं त्यांना कळविली नव्हती. व मुंबईंत ते उतरल्यावरदेखील त्यांनीं ती त्यांना सांगितली नाहीं. पण पहिल्यानें राजकोटास जाऊन मी आईच्या चरणांचें दर्शन घेणार असा मोहनदासांचा निश्चय जेव्हां त्यांच्या मित्रांनीं पाहिला, तेव्हां ती दुःखवार्ता त्यांनीं त्यांस निवेदन केली. ती ऐकून मातृभक्त मोहनदासांस जें दुःख झालें व त्यांचे मनास जी विषण्णता आली त्याची कल्पना मातृभक्तच करूं जाणत. ती मनःस्थिति अंतःकरणानेंच जाणावी, ती शब्दांनीं लिहिणें अशक्य आहे. असो. आई गेल्यामुळें राजकोट त्यांना शून्य दिसूं लागलें व ज्या उत्सुकतेनें ते विलायतेहून घरीं आले ती नाहींशी झाली.

आज्ञापालन

राजकोटास जाण्यापूर्वीं, जुन्या चालीप्रमाणें त्यांच्या वडील बंधूनें त्यांस प्रायश्चित्त घेण्यास सांगितलें व वडील बंधूची आज्ञा शिरसामान्य करून त्यांनीं नाशीक येथें जाऊन ५० रुपये खर्चून सक्षौर प्रायश्चित्त घेतलें. स्वतः मोहनदासांस, स्वज्ञातींत पुनः प्रविष्ट होण्याची एक अट यापलीकडे या विधीचें धार्मिक महत्व कांहींच वाटलें नाहीं. "**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज**" या श्रीभगवंताच्या आश्वासनरूप आज्ञेचें परिपालन करण्यास उद्युक्त झालेल्या मोहनदासांस अशा विधींत धार्मिकता काय दिसणार?

त्यांनीं वडील बंधूंची आज्ञा मान्य करून त्यांच्या मनास खेद होऊं दिला नाहीं एवढेंच.

धर्मपरीक्षेची वेळ

यानंतर सुमारें दीड वर्ष राजकोट येथें वकिली करण्यांत, मुंबईच्या हायकोर्टांत कायद्याचा अभ्यास करण्यांत व हिंदुधर्मशास्त्राचें बारकाईनें अवलोकन करण्यांत त्यांनीं घालविलें. इतक्यांत त्यांच्या अंगच्या गुणांची परीक्षा होऊन त्यांचा धर्म कसोटीस लागण्याची वेळ सन्निध आली. ही परीक्षा जन्मभूमीपासून दूर, अतिदूर अशा भूमींत व्हावयाची होती. अद्यापि ती परीक्षा संपलेली नाहीं. अद्यापि ती चाललेली आहे. अद्यापि मोहनदासांचें सत्व पुनःपुनः कसोटीस लागत आहे. अद्यापि सत्वधीर राजा हरिश्चंद्राच्या सत्वाप्रमाणें तें अढळ आहे. हें जांबूनदसुवर्ण जसजसें पुनःपुनः भट्टींत पडत आहे तसतसा त्याचा जास्त जास्त लखलखाट जगाच्या दृष्टीला पडत आहे. ह्या अतुल तेजस्वी सुवर्णानें नंदनवनाहूनही प्रियतम अशा आपल्या जन्मभूमीचें ‘ सुवर्णभूमि ’ हें नांव सार्थ केलें आहे. धन्य मोहनदास ! आणि धन्य त्याची सत्वधीरता ! सत्वशील भरतभूपति हरिश्चंद्राच्या भूमींत जन्मास येऊन जन्मभूमीचें ऋण त्यानें फेडलें यांत शंका नाहीं. आज त्याची कीर्ति सज्जनांच्या हृदयाकाशांत प्रकाशून राहिलेली आहे, आणि अनंत कालपर्यंत ती अशीच प्रकाशत राहील.

दक्षिण आफ्रिकेची पहिली सफर

वर सांगितल्याप्रमाणें विलायतेहून आल्यावर सुमारें अठरा महिने लोटतात न लोटतात तोंच त्यांच्या बंधूमार्फत एका पेढीकडून एका खटल्यांत वकीलपत्र घेऊन दक्षिण आफ्रिकेस जाण्याविषयीं त्यांस आमंत्रण आलें. हें आमंत्रण त्यांनीं स्वीकारलें, आणि इ. स. १८९३ सालीं ते दक्षिण आफ्रिकेंत गेले. या वेळीं त्यांस स्वप्न देखील पडलें नाहीं कीं, जिकडे आपण जात आहों तेथें आपल्या सत्वाची परीक्षा होणार आहे. विलायतेंत जशा लोभानें व प्रेमानें आंग्ल सुजनांनीं आपल्यास वागविलें तसाच लोभ या नव्या भूमींतही आपल्याला आढळेल असें मोहनदासांस वाटलें होतें, पण अनुभव निराळा आला. दक्षिण आफ्रिकेंत कातडीच्या रंगावरून एका परमेश्वराचीं लेंकरें आपसांत भेदभाव करितात हें पाहून त्यांचें अंतःकरण विव्हल झालें. न्यायकोर्टांत, आगगाडींत, घोड्याच्या गाडींत, रस्त्यांत, पथिकाश्रमांत, भोजनगृहांत, प्रत्येक स्थळीं त्यांना असा अनुभव आला. त्यामुळें त्यांचें मन इतकें विटलें, आणि त्यांस इतका विषाद उत्पन्न झाला कीं, “ नको ही दक्षिण आफ्रिका ! आपण आपले परत आपल्या देशीं जाऊं. ” आणखी ते कदाचित् परत आलेही असते; आणि हें भविष्य जाणूनच कीं काय, ईश्वरानें त्या पोरबंदरच्या पेढीस मोहनदासांशीं, एक वर्ष दक्षिण आफ्रिकेंत राहण्याचा करार करून घेण्याची प्रेरणा केली होती. त्या करारामुळें ते अडले.

हे प्रिटोरियांतील बारा महिने त्यांनीं योगाभ्यासांत घालविले. हा योग ह्मणजे नाक दपटून प्राण कोंडण्याचा नव्हे, तर या योगाहून अत्यंत श्रेष्ठ, अत्यंत दुःसाध्य असा जो आत्मसंयमनाचा योग, त्याचा त्यांनीं अभ्यास केला. या योगाविषयीं श्रीकृष्णांनीं अर्जुनास सांगितलें आहे कीं, “ **मनो दुर्निग्रहं चलं। अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येणच गृह्यते ॥ १ ॥ काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः । महाशनो महापाप्मा विध्येनमिह वैरिणम् ॥ २ ॥** ” हा योग मोहनदासांनीं अभ्यासिला. ह्याच वर्षी एकदा ते प्रेसिडेंट क्रूगरच्या घरापुढील पादपथावरून चालले असतां पाहरेवाल्यानें त्यांस लत्ताप्रहार केला. त्या प्रसंगीं त्यांच्या युरोपियन मित्रांस राग येऊन ते त्या शिपायास न्यायासनापुढें नेण्यास उद्युक्त झाले. पण मोहनदासांनीं ‘ जशास तसें ’ या नीतीचा मार्ग स्वीकारण्याचें नाकारलें.

इ. स. १८९३ सालाचे अखेरीस मोहनदास आपलें काम संपवून स्वदेशीं परत येण्यास निघ-

णार होते. इतक्यांत दक्षिण आफ्रिकेंत निघणाऱ्या एका बर्तमानपत्रांत तिकडील हिंदी लोकांच्या हक्कांस बिरोधक अशा एका नवीन कायद्याचा मसुदा सरकार लवकरच पुढें आणणार आहे अशी बातमी त्यांनीं वाचली. त्यांनीं ती बातमी आपल्या हिंदी मित्रांसही दाखविली, व " या बाबतींत तुम्हीं चळवळ केली पाहिजे, व तुमचें ह्मणणें तुह्मीं सरकारास कळविलें पाहिजे. तुह्मीं असें करावयास तयार असाल तर मी तुह्मांस अर्ज लिहून देतों, " असें त्यांनीं त्यांस सांगितलें. मित्रांस ती गोष्ट पटली व त्याच दिवशीं संध्याकाळीं मोहनदासांनीं आपल्या कामास आरंभ केला.

मोहनदासांच्या चरित्राच्या खऱ्या विकासास येथूनच सुरुवात होते. तो पुढील चरित्रभाग अत्यंत हृदयंगम आहे. या महात्म्याच्या अलौकिक गुणांचें तेज याच त्यांच्या पुढील चरित्रांत भरलेलें आहे. मोहनदासांची अलौकिक सत्यप्रीति, मोहनदासांचा धर्म, मोहनदासांचें प्रेम, व मोहनदासांची **" आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति "** ही रोमरोमांत मुरलेली वृत्ति हीं सर्व त्यांच्या पुढील चरित्रांतच दृष्टीस पडतात. तोफांच्या गोळ्यांच्या आगींत जाऊन त्यांनीं दुःखार्तांची सेवा केली आहे, आपलें सर्वस्व दीनजनांच्या हितार्थ खर्चून अगदीं गरीबापेक्षांही गरीबाच्या वृत्तीनें ते रहात आले आहेत, इतरांस दुःखी पाहून सुखांतून दुःखांत, सुस्थितींतून हालअपेष्टांत शेंकडो वेळां त्यांनीं उड्या टाकल्या आहेत, स्वतःचें सुख ही भावनाच त्यांच्या मनांतून मावळली असून इतरांच्या सुखांत सुख व दुःखांत दुःख ते मानीत आले आहेत.

मोहनदासांचें ध्येय धन नाहीं, कीर्ति नाहीं, किंवा महत्पदप्राप्ति नाहीं, तें ध्येय दिव्य आहे. हिंदी, इंग्लिश, बोअर अगर इतर कोणतेही लोक असोत, परमेश्वराचीं सर्व लेंकरें सुखी असावीं, परस्परांपासून परस्परांस दुःख न होतां प्रत्येकाची प्रत्येक कृति इतरांस सुखप्रद व्हावी हीच मोहनदासांची एक इच्छा आहे. या इच्छेप्रमाणें त्यांची कृति आहे, आणि ही कृति **' लोखंडाचे चणे '** खाऊन ते आज वीस वर्षें करीत आले आहेत. हा वीस वर्षांचा हृदयंगम वृत्तांत पुढील खेपेस सांगूं.



बाई फातिमाबाई शेख मेहताब.

दक्षिण आफ्रिकेंतील आपल्या हिंदी भगिनींस अन्यायानें कारागृहवास भोगावा लागत आहे, हें ऐकून ह्या बहादूर बाईचें हृदय विव्हल झालें. व गेल्या आक्टोबरच्या १३ व्या तारखेस व्हालकरस्टला ती गेली. त्या ठिकाणीं तिला तीन महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. ही बाई अरबी व गुजराथी शिकलेली आहे. मोहनदासांच्या नेतृत्वाखालीं चालू असलेल्या दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहाच्या मोहिमेंत भाग घेणारी ही पहिली मुसलमान बाई होय.



मोहनदास श्लेशिनबाई कालेंबेंच, मोहनदासांचे मदतनीस.
मोहनदासांच्या सेक्रेटरी,

मोहनदास करमचंद गांधी

अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम् ।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥ १ ॥

तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।
भवंति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥ २ ॥ श्रीमद्भगवद्गीता

आर्ता दया ते ऐसी । पूर्णचंद्रिका जैसी । निववितां न कडसी । साने थोर ॥ १ ॥ तैसें दुःखितांचें शिणणें । हिरतां सकणवपणें । उत्तमाधम नेणें । विवंचूं गा ॥ २ ॥ पैं जगीं जीवनासारिखें । वस्तु अंगवरी उपेखे । परि जातें जीवित राखे । तृणाचेही ॥ ३ ॥ तैसें पुढिलांचेनि तापें । कळवळलीये कृपे । सर्वस्वेंसी दिधलें आपणपें । तऱ्ही थोडेंचि गमें ॥ ४ ॥ तो पुरुष वीर राया । मूर्तिमंत जाण दया । मी उदयजतांचि तया । ऋणिया लाभें ॥ ५ ॥ .... ॥ कां जगाचें आंध्य फेडित । श्रीयेची राउळें उघडित । निघे जैसा भास्वत । प्रदक्षिणे ॥ १ ॥ तैसीं बांधिलीं सोडीत । बुडालीं काढित । सांकडी फेडित । आर्तांचिया ॥ २ ॥

—ज्ञानेश्वरी



करमचंद गांधी

वाचक हो ! मोहनदासांची जन्मभूमि, त्यांचा जन्म, त्यांचे वाडवडील, त्यांची माता, त्यांचा विद्याभ्यास, त्यांचा विवाह, शाळेंत असतानांचें त्यांचें आचरण, त्यांचें विलायतेस प्रयाण, व तेथें त्यांस आलेला अनुभव, व कामाच्या निमित्तानें त्यांचें दक्षिण आफ्रिकेस गमन याविषयींची हकीगत गेल्या खेपेस सांगितली. एथपर्यंत त्यांच्या चरित्राचा पूर्वरंग झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हा वेळपर्यंत त्यांनीं ज्या गोष्टी केल्या त्या सर्व खासगी व्यवहाराच्याच होत्या. सार्वजनिक कृत्य असें पहिल्या तेवीस वर्षांत त्यांनीं कोणतेंच केलें नाहीं. पण पुढें ज्या पुरुषाच्या अलौकिक गुणांच्या तेजानें कोट्यानुकोटि जनांस दिपवून टाकिलें त्या महापुरुषाचें पूर्वचरित्र कसें होतें व अगदीं प्रारंभापासून त्या

पुरुषाच्या मनोवृक्षाचा परिपोष कसा झाला हें कळावें ह्मणून त्यांच्या चरित्राचा प्रथम भाग थोडा विस्तारानें सांगितला. सार्वजनिक गोष्टींत प्रत्यक्ष भाग घेण्यास त्यांनीं प्रारंभ केला तो इसवी सन १८९३ सालीं. ही १८९३ सालापासून पुढील हकीगत आजच्या प्रसंगीं निवेदन करितों.

इ. स १८९३ सालचे अखेरीस मोहनदास स्वदेशीं परत येण्यास निघण्याचे तयारींत आहेत इतक्यांत दक्षिण आफ्रिकेंतील एका वर्तमानपत्रांत छापिलेली बातमी त्यांच्या नजरेस पडली, व ती वाचून, अधिकाऱ्यांकडे सादर करण्यासाठीं त्यांनीं दरबानमधील हिंदी लोकांस अर्ज लिहून दिला, हें मागील हकीगतीचे शेवटीं सांगितलेंच आहे. ह्या अर्जानें सरकारकडून कांहीं फलप्राप्ति झाली नाहीं, पण त्यानें दुसरें एक मोठें काम केलें. ह्या अर्जानें लोकांस जागें केलें. यानंतर मोहनदासांनीं दुसरा एक अर्ज लोकांकडून सरकारकडे पाठविला. या अर्जावर दहा हजार हिंदी लोकांच्या सह्या होत्या. या अर्जाचा प्रथम थोडासा उपयोग झाला, पण अखेरीस जो कायदा मंजूर होऊं नये अशी त्यांत मागणी केली होती, तो कायदा मंजूर झालाच. असो.

दक्षिण आफ्रिकेंत कायमची वस्ती

हे दोन्ही अर्ज तयार करीत असतां ज्या गोष्टी मोहनदासांस कळून आल्या त्यांचा विचार करून त्यांनीं दक्षिण आफ्रिकेंतील आपल्या हिंदी मित्रांस हिंदी लोकांचे हितास जपणारी एक संस्था स्थापन करण्याची सूचना केली. ही सूचना त्यांस फार पसंत पडली. पण "हें काम तुमच्याशिवाय व्हावयाचें नाहीं. तुह्मी आमच्याबरोबर राहत असलां तर आह्मीं संस्था स्थापन करितों." असें ह्मणून त्यांनीं मोहनदासांचा उपदेश मोहनदासांच्याच गळ्यांत घातला. मोहनदासांस हा पेंच पडला. संस्थेचें काम करून त्याबद्दल पगार घेणें ही गोष्ट मोहनदासांकडून होणें कधींही अशक्य होतें. बरें पैसे न घ्यावे तर चरितार्थ चालणार कसा? तेव्हां ही अडचण त्यांनीं आपल्या मित्रांस सांगितली. त्यावर मित्रांनीं त्यांस वकीलीचें काम मिळवून देण्याचें आश्वासन दिल्यावर त्यांनीं त्यांची विनंति मान्य केली व हिंदुस्थानांत परत येण्याचा बेत रहित केला. नंतर त्यांनीं तेथील सुप्रीम कोर्टांत बॅरिस्टर ह्मणून काम करण्याची सनद मागितली व कोर्टानेंही ती कांहीं आडकाठी न घेतां दिली. अशा अकल्पित रीतीनें केवळ लोककार्यासाठीं मोहनदास दक्षिण आफ्रिकेचे स्थायिक रहिवासी झाले. आपल्या चरितार्थाची सोय येथें होत आहे हें पहातांच मुंबईस येऊन बॅरिस्टरचा धंदा करून धनसंचय करण्याच्या विचारावर त्यांनीं पाणी सोडलें. ते हुशार होते आणि काठेवाडांतील संस्थानांतून पुष्कळ कामकाज मिळून त्यांना मोहोरांनीं आपलें घर भरतां आलें असतें, पण दक्षिण आफ्रिकेंतील आपल्या देशबांधवांच्या दुःखांपुढें त्या मोहोरांची चकाकी त्यांस तुच्छ वाटली. यानंतर दोन वर्षांनीं ह्मणजे इ० स० १८९६ सालीं ते आपल्या पत्नीस व मुलांस घेऊन जाण्यासाठीं हिंदुस्थानांत आले.

पहिला दुःखद अनुभव

हिंदुस्थानांत आल्यावर दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या स्थितीसंबंधानें त्यांनीं एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें व मुंबई, पुणें व मद्रास या ठिकाणीं त्यांचीं याच विषयावर कांहीं व्याख्यानेंही झालीं. मोहनदासांनीं हिंदुस्थानांत येऊन ह्या ज्या गोष्टी केल्या त्यांची बातमी दक्षिण आफ्रिकेंत पाठवितांना रूटरनें तिखटमीठ लावलेल्या भाषेची योजना केली. आणि तिचा परिणाम भयंकर झाला. ती वाचून नाताळमधील लोकमत प्रक्षुब्ध झालें, आणि मोहनदासांच्या नांवानें जो तो दांत ओंठ खाऊं लागला. इकडे मोहनदास हिंदुस्थानांत आपल्या कार्यक्रमांत गुंतले होते. कलकत्ता येथें एक सभा भरविण्याच्या ते खटपटींत होते. इतक्यांत, "पार्लमेंटची बैठक

होणार आहे, तुम्ही त्वरित निघून या" अशी त्यांस नातालमधून त्यांच्या मित्रांची तार आली. ही हांक कानीं पडतांच ते तावडतोब मुंबईस आले व जी पहिली आगबोट सांपडली तिच्यांतून आपल्या पत्नीस व मुलांस बरोबर घेऊन ते दक्षिण आफ्रिकेस जावयास निघाले. ते दिवशीं इ० स० १८९६ च्या नवंबर महिन्याची २८ वी तारीख होती. या आगबोटीचें नांव कूरलंड असें असून हिच्यानंतर दोन दिवसांनीं नादिरी नांवाची आगबोट तिकडेच जावयास मुंबईहून निघाली होती. या दोन्ही आगबोटींवर बहुतेक हिंदी उतारू होते.

आंग्ल महिलेचें सौजन्य

ह्या दोन्ही आगबोटी दक्षिण आफ्रिकेस जाऊन पोंचल्यावर, त्यांचा बंदरांत प्रवेश होण्यास किती अडचणी आल्या, त्यांवरील उतारूंस बंदरांत उतरतांना किती हाल व त्रास भोगावा लागला वगैरे हकीगत येथें देण्यास स्थलावकाश नाहीं. इतर उतारूंबरोबर मोहनदासांची पत्नी व मुलें उतरून सुखरूप घरीं गेलीं, पण मोहनदासांस मात्र उतरतांना फारच त्रास भोगावा लागला. रूटरची बातमी वाचून खवळलेल्या लोकांनीं मोहनदास रस्त्यांतून चालले असतां त्यांजवर दगड, मासे, कुजकीं अंडीं वगैरे फेंकलीं व एकानें तर त्यांजवर जोरानें लत्ताप्रहारही केला. त्या लत्ताप्रहारानें तोल जाऊन जवळच्या लोखंडी कठड्यास ते धरीत आहेत इतक्यांत त्याच इसमानें पुन्हा त्यांजवर दुसरी लाथ मारली, व तिनें तर जवज जवळ ते बेशुद्धच झाले. इतक्यांत ही गोष्ट एका आंग्ल युवतीच्या दृष्टीस पडली. आणि मोहनदासांस ओळखून ती त्या लोकांच्या गर्दीत त्यांच्या संरक्षणास धांवली. त्या थोर बाईनें त्यांच्याजवळ जाऊन आपली छत्री त्यांच्या मस्तकावर उघडून धरिली आणि त्यांच्याबरोबर चालत जाऊन पुढील मार्गांतून त्यांचा बचाव केला. ही थोर मनाची आंग्ल महिला तेथील पोलीस सुपरिंटेंडंटची पत्नी मिसेस अलेक्झँडर ही



मोहनदासांचा जन्म ज्यांत झाला तें घर

होय. ह्या स्वकुलभूषण आंग्लललनेचें गौरव जितकें करावें व तिला जितके धन्यवाद द्यावे तितके थोडेच आहेत. सुपरिन्टेंडेंट अलेक्झेंन्डर यांनींही मोहनदासांस या प्रसंगीं चांगली मदत करून त्यांस सुखरूपपणें त्यांच्या बायकोमुलांकडे पोंचतें केलें. पुढें मोहनदासांनीं छापिलेलें पुस्तक लोकांनीं प्रत्यक्ष वाचल्यावर त्यांचाही पूर्वींचा राग बराच निवळला. असो.

बोअर युद्धांतील रुग्णसेवा

वाचकहो! इतिहासप्रसिद्ध बोअर युद्धाची कथा आपल्यास विदितच आहे. हें युद्ध इ० स० १८९९च्या आक्टोबर महिन्यांत सुरू झालें. या प्रसंगीं सरकारानें हिंदी लोकांस कांहीं कामगिरी सांगून त्यांच्या मदतीचा उपयोग करून घ्यावा ह्मणून मोहनदासांनीं सरकारास विनंति केली. ही विनंति करण्यांत मोहनदासांचा असा हेतु होता कीं, हिंदी लोक ज्याप्रमाणें ब्रिटिश प्रजाजन ह्मणून समान हक्कांचा दावा सांगतात, त्याचप्रमाणें ते प्रजाजनांच्या सर्व जबाबदाऱ्या शिरावर घेण्यासही राजी व खुशी आहेत. "खायाला मामा पण प्रसंगास पाठ दाखवून पळणारे" असा जो आरोप उपहासपूर्वक हिंदी लोकांवर ज्याच्यात्याच्याकडून करण्यांत येतो तोही साफ खोटा आहे, हें आज प्रत्यक्ष दाखवावें, असाही मोहनदासांच्या मागणींत दुसरा हेतु होता. मोहनदासांनीं ही विनंति अधिकाऱ्यांपाशीं पुनःपुनः केली, पण "तुह्मी हिंदी लोक. लढाई कशाशीं खातात हें तुह्मांला ठाऊक नाहीं. सैन्याला तुमची मदत होण्याचें बाजूलाच राहिलें पण उलट तुह्मांला मात्र सांभाळण्याचें काम सैन्याला करावें लागेल. तुह्मांला नाहीं शिस्त, नाहीं शिक्षण. तुमचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं." असें ह्मणून ती पुनः पुन्हा नाकारण्यांत आली. पण इकडे दिवसेंदिवस लढाईची आग जास्त जास्तच भडकत चालली होती. ब्रिटिश आणि बोअर दोन्हीही खवळून गेले होते. निकराचें युद्ध सुरू झालें. रक्ताचे पाट वाहूं लागले. जखमी लोकांचे ढीगावर ढीग पडूं लागले. उभय सैन्यांस त्राहि भगवान् होऊन गेलें. त्यांत ब्रिटिश सैन्यास तर विशेषच. कारण डोंगरांतल्या वाटा आणि त्याही अनोळखी. त्यांतून समोरून शत्रूंकडून तोफांच्या गोळ्यांचा एकसारखा मारा चाललेला. अशा प्रसंगीं मिळेल तेवढी मदत थोडी असें होऊन गेलें यांत नवल काय? या वेळीं अखेर मोहनदासांची इच्छा पूर्ण झाली. काय विचित्र न्याय पहा! ज्याला मदत करावयाची आणि ज्याला खरोखर तिची गरज तो ती नको नको ह्मणतो, पण मदत देणारा पुनःपुन्हा घे घे ह्मणून मागें लागतो. आणि ती मदत तरी कशी? तर मरणाचें भय गिळून करावयाची. पण जे साधु असतात त्यांच्या ठिकाणीं अशीच कृति दृष्टीस पडते. असो. या भयंकर आणीबाणीच्या प्रसंगीं तरी आपली मदत सरकार नाकारणार नाहीं अशा आशेनें मोहनदासांनीं पुन्हा विनंति केली. ही विनंतिही मान्य होण्यास वशीले लावावे लागले. पण अखेर ती मान्य झाली, व मोहनदासांना इंडियन ॲम्ब्युलन्स कोर स्थापन करण्याची परवानगी मिळाली.

इंडियन ॲम्ब्युलन्स कोर

मोहनदासांनीं लगेच आपल्या पथकाची उभारणी केली. थोडक्याच वेळांत एक हजार इसम या तुकडींत येऊन मिळाले. त्यांत जे पुढारी होते ते कांहीं घेतल्याशिवाय काम करण्यास तयार झाले. बाकीच्यांस ओझेवाल्यांचा पगार मिळूं लागला. या मंडळीनें युरोपियन मंडळीबरोबर चढाओढीनें काम केलें व त्यांचीही खात्री पटवून दिली. या युद्धांत जनरल रॉबर्टस् यांचा मुलगा गोळी लागून खालीं पडला त्या वेळीं त्यास सात मैल अंतरावरील दवाखान्यांत वाहून नेण्याचें काम या हिंदी पथकानेंच केलें.

तोफेच्या आगींत जाऊन केलेलें काम

यानंतर कांहीं दिवसांनीं पुन्हा या तुकडीचीनवीन कामगिरीवर योजना झाली. ह्या खेपेस बहुतेक युद्धां-

तील अग्निवर्षावांत त्यांस काम करावें लागलें. जखमी लोकांच्या डोल्या खांद्यावर वाहून वीसवीस व कधीं तीसतीस मैलही त्यांस दूर चालत जावें लागे. या मंडळींत मोहनदास हे एका तुकडीवर मुख्य होते. एके प्रसंगीं युद्ध शिकस्तीचें चाललें होतें, समरभूमि प्रेतांनीं आच्छादून जाऊन क्षणोक्षणीं तिच्यांत भर पडत होती, मदत करणारे कोणी फारसे दिसत नव्हते, अशा वेळीं मेजर बाप्टी हे मोहनदासांकडे येऊन त्यांस ह्मणाले, "या क्षणीं मदतीची फार जरूरी आहे. मी कांहीं तुह्मांला आग्रह करीत नाहीं, पण तुमची तुकडी या वेळीं जर काम करील तर फारच उपयोग होईल." ही मदत ह्मणजे डोंगराच्या कड्यावरून शत्रूंकडील तोफांच्या चाललेल्या माऱ्याच्या जागीं जाऊन करावयाची होती. स्वतःच्या जिवाची मोहनदासांना पर्वा नव्हती. पण इतरांच्या जिवाची हमी ते कशी घेणार ? ह्मणून त्यांनीं आपल्या हाताखालच्या लोकांस "तुह्मीं जाण्यास खुशी आहां काय ?" ह्मणून विचारलें. जसा नायक तशी त्याची सेना. त्यांनीं तत्काल होय ह्मणून उत्तर दिलें. आणि मरणाची भीति न बाळगितां समरांगणावर जाऊन शर्थीनें काम केलें.

प्लेगच्या रोग्यांची सेवा

या लढाईनंतर मोहनदास कांहीं दिवस स्वदेशीं परत येऊन सन १९०३ सालच्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस ते परत प्रिटोरिया येथें गेले. सन १९०४ चे आरंभीं जोहान्सबर्ग येथें सतरा दिवस सारखा पाऊस पडून प्लेग सुरू झाला. एके दिवशीं तर एकवीस माणसें प्लेगनें मेलीं. ही बातमी मोहनदासांचे कानीं येतांच त्यांचें चित्त स्वस्थ राहीना. ते तसेच प्लेग सुरू असलेल्या ठिकाणीं गेले, व लोकांच्या शुश्रूषेची व्यवस्था करण्याचे तजविजीस लागले. रा० मदनजीत व दुसरे चार स्वयंसेवक मदतीस घेऊन त्यांनीं कामास आरंभ केला. एक रिकामी कोठी होती ती साफसूफ करून तिचें हॉस्पिटल बनविलें आणि त्या ठिकाणीं रोगी आणून ठेविले इतक्यांत त्यांस दुसरे एक हिंदी गृहस्थ डॉ० गॉडफ्रे हे येऊन मिळाले. असें ह्मणतात कीं, प्लेगचे रोगी येथें आणून ठेवण्याची ही जी व्यवस्था झाली ती जर झाली नसती आणि रोगी गांवांतच राहते तर जोहान्सबर्गमध्यें केवढा कहर उसळला असता हें सांगवत नाहीं. मोहनदासांनीं, हा प्लेग आहे, याची खबरदारी घ्या, असा इशारा प्रारंभींच म्युनिसिपालिटीस दिला होता, पण त्या वेळीं तिनें त्यांच्या ह्मणण्याकडे लक्ष दिलें नाहीं. आणि यामुळेंच, लोकांची प्राणहानि होत आहे हें पाहून स्वतः मोहनदासांनीं कंबर बांधली. या कामीं त्यांस हिंदी दुकानदारांनीं सामानाचा वगैरे पुरवठा केला. पण प्रत्यक्ष रोग्यांची शुश्रूषा करतो कोण ? डॉ० गॉडफ्रे यांनीं मात्र सबंध दिवस आणि संबंध रात्र अविश्रांतपणें मेहनत केली. आणखी दुसरे पांचसहा स्वयंसेवक असेच सारखे खपत होते. पण याचें कारण स्वतः मोहनदास कंबर बांधून काम करीत होते हें होय. रिचसाहेब यांनींही ह्या प्रसंगीं रोग्यांची शुश्रूषा करण्यांत फार परिश्रम केले. यानंतर दोन दिवसांनीं म्युनिसिपालिटीकडून मदत मिळाली. हा रोगाचा धुमाकुळ सरासरी एक महिनाभर चालला होता.

जखमी झुलूंची शुश्रूषा

यानंतर दोन वर्षांनीं ह्मणजे इ० स० १९०६ या वर्षी झुलू लोकांचें बंड उद्भवलें. याही प्रसंगीं मोहनदासांनीं 'ॲम्ब्युलन्स कोर' तयार करण्याची परवानगी मागितली, व ती मिळण्यास प्रथम कांहीं अडथळे आले तथापि शेवटीं मिळाली. या 'कोर' मध्यें एकंदर तेवीस असामी असून मोहनदास हे त्याचे सार्जंट मेजर होते. ह्या प्रसंगींही त्यांनीं जीवाभावानें काम करून दुखापत पावलेल्या झुलू लोकांची शुश्रूषा केली.

वाचकहो ! आपल्या नित्य उपयोगी पडणारा आपल्या घरांतील नोकर आजारी पडला असतां त्याची स्वतःच्या हातांनीं शुश्रूषा करणारे लोक

किती आढळतील याचा तुह्मींच आपल्या मनाशीं विचार करा. मोहनदासांनीं ज्यांची शुश्रूषा करण्याचें काम आपण होऊन स्वखुशीनें अंगिकारिलें ते लोक ह्मणजे पराकाष्ठेचे गलिच्छ, अत्यंत तामसी वृत्तीचे व रानटी; केवळ राक्षसच असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पण मोहनदासांनीं व त्यांच्या मित्रांनीं स्वतःच्या हातांनीं त्यांच्या घाणेरड्या जखमा धुतल्या, त्यांस औषधें लावलीं आणि त्यांच्या बिछान्यापाशीं राहून त्यांची निगा काढली ! यांतलें इंगित काय ? यांतलें इंगित एवढेंच कीं, ह्या सेवकांचा नायक जो मोहनदास त्याच्या अंतर्दृष्टीनें खरा देव, खरा धर्म ओळखिला होता. रेव्हरंड डोक साहेब ह्मणतात, "एका हिंदी दिवाणाचा मुलगा आपल्या हाताखालीं कांहीं हिंदी स्वयंसेवक घेऊन जखमी झुलूंची शुश्रूषा करीत आहे हा प्रसंग कुशल चित्रकारानें आपल्या कलमानें रेखाटण्यासारखा आहे." असो.

विलायतेंतील कामगिरी

यानंतर मोहनदास पुन्हा जोहान्सबर्गला आल्यावर हिंदी मंडळीनें आपल्या वतीनें विलायतेंत जाऊन खटपट करण्यासाठीं मोहनदास व रा० अल्ली नांवाचे एक मुसलमान गृहस्थ यांस विनंति केली. ही विनंति उभयतांनीं तत्काळ मान्य करून ते कर्तव्यास सादर झाले व विलायतेस् गेले. विलायतेस त्यांना सर्व ठिकाणीं ममतेनें वागविण्यांत आलें. ज्या अधिकाऱ्यांकडे ते गेले त्यांनींही प्रेमानें त्यांच्या मुलाखती घेतल्या व त्यांच्या विलायतेस जाण्याचा बराच उपयोग झाला. लंडन शहरांत असतांना त्यांनी दुसरीही एक कामगिरी केली. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या हिताचें संरक्षण करणारी एक कमिटी त्यांनीं स्थापन केली. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांविषयीं अत्यंत कनवाळू, निस्पृह व खऱ्या इंग्रज मनाचे थोर गृहस्थ लॉर्ड ॲम्पथिल हे त्या कमिटीचे अध्यक्ष झाले, सर मंचरजी भावनगरी हे एक्झिक्युटिव्ह कमिटीचे अध्यक्ष झाले व एल्. डब्ल्यू. रिच नांवाचे साहेब सेक्रेटरी झाली. ह्या कमिटीचा दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांस फारच उपयोग होत आहे.

सत्यसिद्धीसाठीं आत्मयज्ञ

मोहनदास विलायतेस गेल्याचा त्या वेळीं उपयोग झाला खरा. पण तो त्या वेळेपुरताच होता. ज्या कायद्यास सरकारची संमति मिळूं नये ह्मणून खटपट करण्यासाठीं ते विलायतेस गेले होते त्यास, मोहनदास दक्षिण आफ्रिकेंत परत आल्यावर सरकारी मंजुरी मिळाली. ही मंजुरी मिळालेली पहातांच "निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ" या नांवानें प्रसिद्ध असलेली चळवळ सुरू झाली. ही गोष्ट इ. स. १९०७ च्या जुलै महिन्यांत घडली. दक्षिण आफ्रिकेंतील लोकांचीं गाऱ्हाणीं काय आहेत, त्यांच्या मागण्या काय आहेत, कोणते कायदे रद्द करण्याविषयीं सरकाराजवळ ते विनंति करीत आले आहेत वगैरे गोष्टी वर्तमानपत्रांच्या द्वारें सर्वांस माहीत झालेल्या आहेत, तेव्हां त्यांचा उल्लेख येथें करीत नाहीं. मोहनदासांना कारागृहांत जाण्याचे प्रसंग आले ते उपरिनिर्दिष्ट निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ सुरू झाल्यानंतरच होत. ह्या चळवळीस "निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ" असें नांव देण्यापेक्षां सत्यासाठीं आरंभिलेलें आत्मिक युद्ध असें ह्मणणें विशेष शोभेल. कारण सत्याच्या सिद्धीकरितां स्वतःच्या शरीरास व मनास कष्टवून इतरांचीं मनें सत्याकडे वळविण्याकरितां आचरण्यांत येणारें हें तप आहे. मोहनदास या चळवळीचा असाच अर्थ करितात व ते सांगतात कीं, हें तपाचरण करण्यास स्वतःस जे कांहीं क्लेश भोगावे लागतील तेवढेच. पण इतरांस इजा करावयाची नाहीं, हिंसा करावयाची नाहीं हें जें आपल्या धर्माचें मुख्य तत्व तें ह्याच तपानें पाळतां येण्याजोगें आहे. इतरांवर विजय मिळविण्याचे, इतरांस आत्मवश करण्याचे युद्धादिक इतर उपाय आहेत पण ते सर्व उपाय हिंसामय आहेत. ते उपाय आचरून "**अहिंसा परमो धर्मः**" या धर्माचें

आचरण घडत नाहीं. मोहनदासांचें जें हें ह्मणणें आहे त्याप्रमाणें त्यांचें स्वतःचें आचरण आहे. ह्या सत्यसिद्धीच्या तपाचरणास प्रारंभ केल्यापासून मोहनदासांनीं नाना तऱ्हेचे व असह्य असे क्लेश सोसले आहेत, पण दुसऱ्यास दुखवून स्वकार्यसिद्धि करण्याचा त्यांनीं केव्हांही प्रयत्न केलेला नाहीं, एवढेंच नव्हे तर तशा दुष्ट वासनेचा आपल्या मनास स्पर्शही होऊं दिलेला नाहीं. सत्याग्रहाच्या पायीं ते अनेकवार तुरुंगांत गेले, तुरुंगांत जाऊन नाना यातना सोसल्या, त्यांचा शेंकडो वेळां अपमान झाला, पण कधीं त्यांनीं कोणावर हात उगारला नाहीं, किंवा अपशब्द बोलून त्यांनीं आपलें तोंड विटाळलें नाहीं. किंवा दुसऱ्या कोणासही अशा प्रकारचा उपदेश त्यांनीं कधीं केला नाहीं. त्यांची क्लेश सहन करण्याची शक्ति आणि आत्मसंयमन हीं अलौकिक आहेत. आजपर्यंत असह्य क्लेश सहन करणाऱ्या सत्यनिष्ठ महात्म्यांच्या गोष्टी आपण अनेक ऐकिल्या आहेत, पण क्लेश सहन करून मनाची शांति कायम ठेवणारे राजा हरिश्चंद्रासारखे महात्मे विरळा. आणि पुन्हा मोहनदास हा कठीण मार्ग कां आणि कोणासाठीं आक्रमित आहेत ह्याचा विचार केला ह्मणजे या महात्म्याच्या आत्मयज्ञाचें विशेषच कौतुक वाटतें. दक्षिण आफ्रिकेंत स्वतःच्या चरितार्थाचा उद्योग करणाऱ्या हिंदी लोकांचा योगक्षेम सुखानें चालावा ह्मणून हा महात्मा स्वतःची काया, स्वतःचा जीव आटवीत आहे. केवळ हिंदी लोक सुखी व्हावे एवढीच त्याची इच्छा नाहीं, तर सर्व मनुष्यमात्रांस सुखी पहावें ही त्याच्या चित्ताची प्रार्थना आहे. अशा साधु पुरुषानें कोट्यानुकोटी जनांचीं अंतःकरणें आपल्याकडे आकर्षण करून घ्यावीं यांत नवल काय? असो.

तुरुंगवासांतील परोपकार

मोहनदासांच्या तुरुंगवासाचीं वर्णनें वाचलीं ह्मणजे हृदय विव्हल होतें. तुरुंगांत असतांना देखील आपल्या सोईपेक्षां इतरांचीच काळजी त्यांनीं जास्त घेतली आहे. मोहनदास लिहितात, "एके वेळीं एक वार्डर मजकडे आला आणि शौचकूप साफ करण्यासाठीं दोन इसम मजकडे मागूं लागला. मी असा विचार केला कीं, हें काम दुसऱ्याला सांगण्यापेक्षां मींच जाऊन करावें हेंच बरें व त्याप्रमाणें मी तें केलें. या कामाचा मला मुळींच कंटाळा वाटत नाहीं." तुरुंगांत मोहनदासांना सक्त मजुरी करावी लागे. एकवेळ जमीन खणण्याचें काम त्यांस नेमून दिलें होतें तें करीत असतां त्यांच्या हातांचीं सालें निघून त्यांस फोड आले. कुदळ उचलवेना अशी स्थिति झाली. या वेळींदेखील त्यांनीं कामाचा त्रास मानला नाहीं. ते ह्मणतात, "त्या वेळीं माझी अब्रू राखण्यासाठीं मी देवाची प्रार्थना केली आणि मला नेमून दिलेलें काम चोख होऊं दे ह्मणून मी त्यास विनविलें." तुरुंगवासांत मोहनदासांना बहुधा अर्धपोटींच दिवस काढावे लागत. कारण जें खाणें तेथें मिळे तें चांगलें नसल्यामुळें त्यांच्यानें खाववत नसे. तुरुंगांतील हिंदु व मुसलमान कैद्यांस तूप मिळत नसे. तुपाच्या ऐवजीं सर्व कैद्यांस डुकराची चर्बी मिळे. अर्थात् हिंदु व मुसलमान ती घेत नसत. शिद्दी वगैरे कैद्यांना ती चाले. मोहनदासांनीं याबद्दल तुरुंगावरील डॉक्टरकडे विनंति केली. तेव्हां त्यानें मोहनदासांस तूप देण्याचा हुकूम केला. पण त्यांनीं सर्वांस तूप मिळेपर्यंत आपण एकट्यानेंच तूप खाण्याचें नाकारलें. ते ह्मणतात "त्याच दिवशीं मला भात व भाकरी दोन्ही मिळालीं. मला त्या वेळीं फार भूक लागली होती. पण मी एकटाच भाकरी कशी खाऊं? मी ते दोन्ही पदार्थ परत केले." मोहनदासांनीं हा तुपासंबंधाचा आग्रह दीड महिना सारखा धरला तेव्हां शेवटीं ज्या तुरुंगांत हिंदी कैदी अधिक असतील तेथें त्यांस तूप यावें असा हुकूम झाला. अशा रीतीनें इतरांसाठीं स्वतः होऊन चालविलेल्या उपासमारांतून मोहनदास दीड महिन्यानें मुक्त झाले.

मोहनदासांची रहाणी

ही तुरुंगांतील गोष्ट झाली. पण एरव्हीं तरी मोहनदासांची राहणी बॅरिस्टरी थाटाची आहे काय? नाहीं. ते अगदीं साध्या तऱ्हेनें एखाद्या गरीबासारखे राहतात. आपल्या धंद्यांत त्यांनीं पैसा कमाविला व कमावितात पण तो सर्व दीन जनांच्या दुःखपरिहारार्थ ते खर्च करितात. लोकांनीं त्यांस आपले प्रतिनिधि ह्मणून विलायतेस पाठविलें तेव्हां प्रवासखर्चासाठीं त्यांनीं त्यांस दिलेला पैसा त्यांनीं परत आणून लोकांच्या स्वाधीन केला. त्याचप्रमाणें लोकांनीं त्यांस अनेक वेळां कृतज्ञतेचें स्मरण ह्मणून अनेक नजराणे दिले पण त्यांपैकीं त्यांनीं एकासही न शिवतां ते सर्व सार्वजनिक कार्यास देऊन टाकले. मोहनदास जीं कामें करतात त्याबद्दल ते पैसे घेतात काय? असा प्रश्न नाताळांतील कोणाही हिंदी इसमास केला तर त्यास राग येतो. इतकी मोहनदासांची द्रव्यलोभाविषयींची पराङ्मुखता आबालवृद्धांच्या अंतःकरणास पटली आहे. दरमहा १५ रुपयांच्या आंत ते आपला जेवणखाणाचा वगैरे सर्व खर्च भागवितात ते दिवसांतून दोन वेळां जेवतात व पाणी अगर दूध यांशिवाय दुसरें कांहीं पेय पीत नाहींत. दुपारचें जेवण बहुधा एक अगर दीड वाजतां करतात. तें बहुतेक ओल्या व सुक्या फळांचें असतें. त्यानंतर खरें जेवण सायंकाळीं सात वाजतां होतें व तें स्वतःच्या हातांनीं शिजविलेलें असतें. चहा, कॉफी, कोको वगैरे पिण्याचें त्यांनीं सोडून दिलें आहे. घरांतील भांडीं घांसणें, स्वतःचे कपडे धुणें, घरांतील केर काढणें, आपला बिछाना घालणें वगैरे कामें ते स्वतः करितात. हीं कामें ते दुसऱ्यास कधींही करूं देत नाहींत. आपल्यासाठीं हीं कामें दुसऱ्यांनीं करणें हें सर्व माणसें सारखीं आहेत, (equality for all) या तत्वाशीं विसंगत आहे असें त्यांस वाटतें. (equality for all हें तत्व प्रतिपादन करणारांत मोहनदासांसारखें आचरण करणारे कितीक असतील त्यांची संख्या वाचकांनींच मोजावी.) मोहनदासांच्या जेवणाचे पदार्थ ह्मटले ह्मणजे भाजी, भाकरी व फळें एवढेच असतात, व शरीरयात्रा चालण्यास जेवढें पाहिजे तेवढेंच ते खातात. याविषयीं त्यांचें असें मत आहे कीं, शरीरसंरक्षणास आवश्यक इतकाच आहार करण्याची संवय ठेविल्यानें आत्म्याची अधिकाधिक शुद्धि होत जाते. त्यांनीं जी "टॉलस्टाय फॉर्म" नांवाची कौंट टॉलस्टाय यांच्या पद्धतीवर वसाहत केली आहे त्या वसाहतींतून लिहिलेल्या एका पत्रांत ते ह्मणतात, "या शेतांतील मंडळीस लागणाऱ्या भाकऱ्या मी तयार करतों. भाकऱ्या चांगल्या होतात असें मंडळीचें मत आहे. मणिलाल (मोहनदासांचा मुलगा) व आणखी कांहींजण भाकऱ्या करावयास शिकले आहेत. भाकऱ्यांना लागणारे गहूं आह्मीच दळतों. शेतांत तयार झालेल्या नारिंगाचा आह्मीं नुक्ताच मुरंबा घातला आहे. मी धान्याची कॉफी करावयास शिकलों आहें. अगदीं लहान मुलांना देखील ती द्यायाला हरकत नाहीं. इकडील मंडळीनें चहा व कॉफी घेण्याचें सोडून दिलें असून सगळेजण हीच कॉफी घेतात. गहूं भाजून ते दळतों व त्याची आह्मी कॉफी तयार करतों. सध्या आह्मी सर्व मंडळी कांहीं बांधकाम करीत आहों. साधी वृत्ति व साधी रहाणी ह्मणतात ती ही. असो. कितीही थंडी पडो, मोहनदास गार पाण्याचें स्नान करितात व उघड्या ओसरीवर झोंपतात. बाहेर हिंडतांना त्यांना युरोपियन तऱ्हेचा पोशाख करावा लागतो, पण घरीं त्यांचा पोषाख हिंदु पद्धतीचा असतो. मागें ते हिंदुस्थानांत आले होते तेव्हां हिंदु पद्धतीचाच पोशाख करीत. ते नेहमीं हातमागावर विणलेलें कापड वापरतात. अत्यंत साध्या रीतीनें रहाण्याची संवई त्यांनीं आपल्यास इतकी लावून घेतली आहे कीं, तो त्यांचा आतां स्वभावगुणच होऊन गेला आहे. ह्या त्यांच्या वृत्तीचें वर्णन करितांना त्यांचे मित्र

दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांशीं सहानुभूति दाखविणारे उदार अंतःकरणी पुरुष.



लोकप्रिय व्हाइसराय लॉर्ड हार्डिंज



लॉर्ड क्र्यू
सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इंडिया



मुंबईचे लोकप्रिय गव्हरनर
लॉर्ड विलिंग्डन



हिज हायनेस आगाखान



नामदार सर फेरोजशहा मेथा के. सी. आय्. ई.



नामदार गो. कृ. गोखले, सी. आय्. ई.



मि. पोलॉक

डॉ० मेथा यांनीं भर्तृहरीचा पुढील यथार्थ श्लोक उतरून घेतला आहे:—

क्वचिद्भूमौ शायी क्वचिदपि च पर्यङ्कशयनः
क्वचिच्छाकाहारी क्वचिदपि च शाल्योदनरुचिः।
क्वचित्कन्थाधारी क्वचिदपि च दिव्याम्बरधरो
मनस्वी कार्यार्थी न गणयति दुःखं न च सुखम्

[महीपृष्ठीं केव्हां अवचट पलंगीं पहुडतो।
क्षुधेतें शाकान्नें अवचट सदन्नें निववितो॥
कधीं कंथाधारी अवचट सुवस्त्रीं मिरवितो।
मनस्वी कार्यार्थी किमपि सुखदुःखें न गणितो॥]

अशा तऱ्हेची मोहनदासांची रहाणी आहे. अशा तऱ्हेचें मोनहदासांचें नित्याचें वर्तन आहे. स्वतःच्या मेहनतीनें कमावलेलें पोटापुरतें अन्न व आच्छादनापुरतें वस्त्र एवढ्यांतच संतोष मानून आपली काया, वाचा आणि मन लोकसेवेस लावावयाचें हा त्यांचा निर्धार आहे. स्वसुखाचा त्यांना अभिलाष नाहीं ही गोष्ट त्यांनीं अनेक वेळां आनंदानें तुरुंगवास पतकरला यावरून सिद्ध होतच आहे. पण त्यांची कर्तव्यनिष्ठा याहूनही जाज्वल्य आहे. महाकवि **भवभूतीनें श्रीराममुखां**-तून जे उद्गार वदविले आहेत तेच उद्गार मोहनदासांच्या बाबतींतही लागू पडतात. ते उद्गार हे:—

स्नेहं दयां तथा सौख्यं यदि वा जानकीमपि।
आराधनाय लोकस्य मुंचतो नास्ति मे व्यथा॥

फक्त मोहनदासांच्या मुखीं हे उद्गार योजितांना 'लोकस्य' या पदाऐवजीं 'सत्यस्य' या पदाची योजना करणें अधिक युक्त होईल. कारागृहांत जातांना मागें माझ्या बायकोमुलांचें कसें होईल, त्यांचा उदरनिर्वाह कोण चालवील याची काळजी ते कधींही करीत नाहीं. ईश्वरावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे आणि त्याच्यावर हवाला टाकून ते कर्तव्यास वाटेल त्या वेळीं सादर होण्यास तयार असतात.

इंडियन ओपिनियन.

मोहनदासांचा स्वार्थत्याग व साधुवृत्ति यासंबंधानें आणखी दोन गोष्टी या ठिकाणीं सांगितल्या पाहिजेत. या दोन गोष्टी ह्मणजे त्यांनीं चालविलेलें "**इंडियन ओपिनियन**" नामक वर्तमानपत्र व त्यांनीं स्थापन केलेली "टॉलस्टॉय फार्म" नांवाची छोटी वसाहत ह्या होत. आपल्या विचारांस जर मूर्त स्वरूप आलें पाहिजे तर लोकांच्या मनाशीं आपण सतत दळणवळण ठेविलें पाहिजे, व हें दळणवळण ठेवण्याचा उत्कृष्ट मार्ग ह्मटला ह्मणजे वर्तमानपत्र हा होय, असा मोहनदासांच्या मनाचा विचार ठरल्यावर तो अमलांत आणण्यासाठीं "इंडियन ओपिनियन" ह्या वर्तमानपत्राची त्यांनीं संस्थापना केली. नाझर नांवाच्या गृहस्थांनीं या पत्राच्या संपादकाचें काम मोफत करण्याचें पतकरलें, व इंग्लिश, गुजराथी, तामीळ आणि हिंदी ह्या चार भाषांत हें पत्र निघूं लागलें. यापैकीं इंग्रजी मजकूर मोहनदास लिहित असत. पहिल्याच वर्षीं मोहनदासांना आपल्या उत्पन्नांतून ह्या पत्राच्या खर्चासाठीं दोन हजार पौंडांची रक्कम द्यावी लागली. ह्या पत्राला लोकाश्रय विशेष नव्हता आणि पुढें मिळेल अशीही आशा नव्हती. अशा स्थितींत दुसरा कोणी असता तर त्यानें तें पत्र 'तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु' केलें असतें. पण मोनहदासांनीं समजूनउमजून लोकसेवेसाठीं हें वर्तमानपत्र चालविलें आहे, आणि त्यानें दक्षिणआफ्रिकेंतील हिंदी लोकांची पुष्कळ कामगिरी बजाविली आहे. या पत्राच्या पायीं त्यांनीं आजपर्यंत किती झीज सोसली असेल हें त्यांचें त्यांसच ठाऊक. एवढें मात्र खरें कीं, त्यांचा थोर हेतु पाहून पोलॉकसारखीं माणसें त्या पत्राचें संपादकत्व करण्यास संतोषानें पुढें आलीं.

टॉलस्टॉय फार्म

आतां 'टॉलस्टॉय फार्म' हें काय आहे हें पाहूं. मोहनदास सांगतात, "सन १९०४ सालीं प्लेगची गडबड आटोपल्यावर, नाताळमधील टोंगाट गांवीं माझे चुलत भाऊ रहात असत, त्यांना भेटावयास मी गेलों होतों. त्यांचें दुकान मीं पाहिलें, पण त्यापेक्षां घरामागल्या बाजूस

फळझाडांची लहानशी बाग होती तिकडे माझें विशेष लक्ष गेलें. तीं झाडें मला इतकीं सुंदर दिसलीं आणि त्या जमिनीचा मगदूर माझ्या मनांत इतका भरला कीं, माझे भाऊ ही सुंदर जमीन व्यर्थ घालवित आहेत असें मला वाटलें. मजूरांकडून ते बागेची मशागत करीत असत, अर्थातच ती जेमतेम होई. पण स्वतः यांनीं मेहनत करून जमिनीची उपार्जना कां बरें करूं नये? असा मी आपल्यासच प्रश्न केला. इकडे येत असतां वाटेंत मी रस्किनचें "अन्टु धिस लास्ट" हें पुस्तक वाचलें होतें आणि त्या पुस्तकाची छाप माझ्या मनावर बसली होती. हें स्वप्न खात्रीनें खरें ठरवितां येईल असें मला वाटलें."

मोहनदासांच्या मनांत हे विचार आल्यावर त्यांनीं ते आपला बंधु छगनलाल व आपला चुलतबंधु यांजपाशीं बोलून दाखविले. मोहनदासांचें स्वप्न त्यांनाही पसंत पडलें, व तें खरें करण्याचे तयारीस ते लागले. ही नवीन वसाहत वसविण्यासाठीं त्यांनीं आपलीं घरें व दुकानेंही विकलीं. मोहनदासांनीं नंतर दरबानला जावून आपली योजना आपले इंग्रज मित्र मि० वेस्ट यांना सांगितली. वेस्ट साहेब हे त्या वेळीं "इंडियन ओपिनियन" च्या छापखान्यावर व्यवस्थापक होते. त्यांसही ती पसंत पडून तेही त्या मंडळीस मिळाले. ह्या सर्व गोष्टींपासून फलनिष्पत्ति अशी झाली कीं, दहा दिवसांनीं वसाहतीस योग्य असें फॉनिक्समधील एक क्षेत्र मोहनदासांनीं विकत घेतलें आणि महिन्याच्या आंत त्या ठिकाणीं लोखंडी घराची उभारणी केली. नंतर तिकडे छापखाना नेला. आणि "इंडियन ओपिनियन" तेथें प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. आतां त्या ठिकाणीं कांहीं घरें झालीं असून एक शाळाही चालू झाली आहे. या वसाहतींत प्रत्येक इसम जमिनीची लागवड करतो व कोणी स्वस्थ बसून दुसऱ्याच्या मेहनतीचें फळ आपण भोगीत नाहीं. मोहनदासांनीं आपलें घर याच ठिकाणीं बांधलें असून ते घरीं असले ह्मणजे इतरांबरोबर काम करावयास लागतात. ही वसाहत करण्यासाठीं मोहनदासांना श्रम व सायास थोडेथोडके पडले नाहींत. पण जें स्वप्न त्यांनीं मनांत आणलें तें अखेर त्यांनीं खरें झालेलें पाहिलें. या वसाहतीच्या स्थापनेपासून "इंडियन ओपिनियन" ची व्यवस्थाही चांगली झाली आहे. व ही वसाहत स्थापन करण्याचा एक मुख्य उद्देश या वर्तमानपत्राच्या खर्चाची कांहीं तरी कायमची व्यवस्था व्हावी हा होता.

धार्मिक व सामाजिक मतें

मोहनदासांचीं धार्मिक व सामाजिक मतें काय आहेत तें सांगावयास एक स्वतंत्र लेखच लिहिला पाहिजे. ते हिंदु आहेत, वैष्णव आहेत, श्रीमद्भगवद्गीतेवर त्यांची अप्रतिम निष्ठा आहे, पण इतर धर्मासंबंधानेंही त्यांच्या मनांत विलक्षण पूज्य बुद्धि असून जगांत होऊन गेलेल्या सर्व महात्म्यांस ते आपले गुरु समजतात. अलीकडील भौतिक सुधारणा— अजस्र कारखाने आणि प्रचंड यांत्रिक उद्योग —हे त्यांस मान्य नाहींत. ह्या गोष्टीनीं प्रत्येक देशांत दारिद्य वाढविलें असून मनुष्यमात्राच्या सुखास कृतिमता आणली आहे असें त्यांचें ह्मणणें आहे. ह्या सुधारणांनीं मनुष्यें ह्मणजे केवळ श्रम करणारीं यंत्रें बनविलीं असून अल्पसंतुष्ट, सुखी व समाधानी कुटुंबांची संख्या त्यांनीं नामशेष करीत आणली आहे, असा राष्ट्रांच्या सांपत्तिक स्थितीचें सूक्ष्म रीतीनें अवलोकन करून त्यांनीं निष्कर्ष काढला आहे. निरनिराळ्या धर्मांच्या ग्रंथांचें त्यांनीं श्रद्धेनें परिशीलन केलें असून सत्य, परोपकार आणि आत्मदमन हेंच सर्व धर्मांचें रहस्य आहे व तेंच यावज्जीव मनुष्यानें आचरिलें पाहिजे असा त्यांचा धर्माविषयीं सिद्धांत झालेला आहे.

सत्य, परोपकार आणि आत्मदमन यांचा प्रभाव केवढा असतो याचें मोहनदास हें प्रत्यक्ष उदाहरण आहे. ह्या गुणांच्या प्रभावानें कोट्या-

वर्षी लोकांच्या अंतःकरणांत मोहनदासांनीं पूजास्थान मिळविलें आहे, आणि लॉर्ड क्रयूसारख्यांनीं " महात्मा " ह्मणून त्यांची थोरवी प्रांजलपणें कबूल केली आहे.

मोहनदासांनीं हिंदुस्थानांत राहून बॅरिस्टरचा धंदा केला असता तर त्यांनीं पुष्कळ संपत्ति कमावून उत्तुंग प्रासाद बांधिले असते, व त्यांच्या प्रासादांनीं पोरबंदरास अगर मुंबापुरीस शोभाही आणिली असती. पण त्यांनीं आपल्या सद्गुणांच्या अविनाशी पायावर रचिलेलें जें कीर्तिमंदिर उभारलें आहे, आणि त्यावर आत्मयज्ञाचा जो कळस चढविला आहे, त्याचें दिव्य तेज आज त्रिभुवनांत झळाळत आहे. पाषाणमय मंदिराचा नाश काल करील, पण या कीर्तिमंदिराचा नाश काल करूं शकेल काय ? नाहीं. कालाच्या अंगांत तें सामर्थ्य नाहीं. कालानें अयोध्येचा नाश केला पण श्रीरामाच्या यशोगीताचा नाश करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं नाहीं. हरिश्चंद्राची राजधानी कालानें रसातलास नेली, पण हरिश्चंद्राची कीर्ति त्याला हिरावून नेतां आली नाहीं प्रल्हादसुधन्व्यांचें राजवैभव स्मृतिशेष झालें, पण त्यांची कीर्ति कालाच्या आघातापासून अमर आहे. मोहनदासांच्या सत्याचरणाची कीर्ति कालाला कधींही हिरावून नेतां येणार नाहीं. भगवान् असे मोहनदास भरतखंडांत अनेक निर्माण करो.

पत्नी आणि पुत्र.

मोहनदासांच्या सुशील भार्येसंबंधानें पूर्वी सांगितलेंच आहे. तिनेंही भरतखंडांतील साध्वींस उचित असें वर्तन करून आपल्या पतीच्या धवल कीर्तींत आणि निर्मल यशांत भर घातली आहे. सर फेरोजशाहा मेथा ह्यांनीं ह्या नारीरत्नास आर्यावर्तांतील प्राचीन सतींच्या मालिकेंत बसवून तिचा जो बाहू उभारून महासभेत जयजयकार केला तो योग्य नाहीं असें कोण ह्मणेल ? बालवयांत विवाहसमयीं ब्राह्मणांनीं वैदिकमंत्र ह्मणून दिलेल्या आशीर्वादाचा अर्थ तिला त्या वेळीं कळला नसला तरी आपल्या आचरणानें ते आशीर्वाद तिनें सफल केले यांत संदेह नाहीं. अशीं स्वकुलाची व स्वदेशाची इभ्रत वाढविणारीं, पुण्याईत भर घालणारीं, व कीर्तिपरिमल दिगंतीं पोंचविणारीं जोडपीं या भूमींत अनेक उत्पन्न होवोत.

मोहनदासांचे पुत्रही मोहनदासांसारखेच निपजले आहेत. त्यांचा वडील मुलगा हिरालाल त्यांच्याच सारखा परोपकारी, व स्वसुखनिरभिलाषवृत्तीचा असून सत्याग्रहाच्या तपाचरणांत अनेक वेळां आनंदानें कारागृहांत गेला आहे. त्यांचा दुसरा मुलगा मणिलाल हाही वडील बंधूचा कित्ता गिरवीत आहे. फेरीवाल्याचा धंदा करीत असतां त्यालाही तुरुंगवास पतकरावा लागला, पण त्यानें त्या आपत्तीचा त्रास मानिला नाहीं. हिरालालचें लग्न झालें आहे. पण मणिलालच्या मनांत आजन्म ब्रह्मचारी राहून लोकसेवा करावयाची आहे असें ह्मणतात.

मोहनदास आणि त्यांचें कुटुंब यांच्याविषयीं देवाजवळ निराळें काय मागावयाचें आहे ? मुक्तेश्वरांनीं ह्मटलें आहे कीः—

सत्य सन्मार्गीं वर्ततां नर। त्याचा कैवारी जगदिश्वर। त्याचें कार्य शार्ङ्गधर। आपण आंगें संपादी॥

" भक्तांचा कैवारी हरि " हा त्याच्या ब्रीदाचा तोडर त्रिभुवनांत गर्जत आहे. आणखी भगवंतांनीं स्वतः आश्वासन देऊन ठेविलें आहे कीं,

न मे भक्तः प्रणश्यति!

[हें चरित्र पूर्ण करण्यापूर्वी हें लिहिण्यास ज्या पुस्तकांची विशेष मदत झाली त्यांचा येथें कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें जरूर आहे. हीं पुस्तकें दोन होत पहिलें, रेव्हरंड जोसेफ जे. डोक यांनीं लिहिलेलें मोहनदासांचें चरित्र हें होय. याची प्रस्तावना लॉर्ड ॲम्पथिल यांनीं लिहिली आहे हें पुस्तक फारच सुंदर आहे. दुसरें पुस्तक डॉ० पी. जे. मेथा यांनीं लिहिलेलें मोहनदासांच्या चरित्रांतील कांहीं गोष्टी हें होय. हेंही पुस्तक सुंदर असून यांत मोहनदासांच्या मतांची चांगली माहिती आहे.]